रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड | गुरुवार । दि. ६ ऑगस्ट २०२६ । अंक ६१ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## निना वनगेंनी घेतली एसपींची भेट

**पेण :** उद्योजक मयुर वनगे मारहाण प्रकरणातील मुख्य आरोपी म्हणून पोलीस ठाण्यात नोंद असले मंगेश दळवी, हरेश दळवी, रूपेश दळवी आणि रंजीत दळवी हे गुन्हा दाखल झाल्यापासून पोलिसांच्या ताब्यात आलेले नसल्याने पेण शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे. या घटनेला तीन दिवस उलटूनही आरोपी फरार असल्याने मयूर वनगे यांच्या पत्नी निना वनगे यांनी थेट रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांची बुधवारी भेट घेत आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे. यावेळी पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी या प्रकरणाचा गांभीर्याने पान २ वर

## शिंदेंचं संपूर्ण सरकारच बेकायदेशीर

**नवी दिल्ली :** शिवसेना कुणाची? धनुष्यबाण चिन्ह कुणाचं? यावरून सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. ठाकरे गटाचे ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल हे युक्तिवाद करत आहेत. सिब्बल यांनी तोडीस तोड युक्तिवाद करून शिंदे गटाचा पक्ष फोडण्याचा प्लानच उघड केला आहे. तसेच एकनाथ शिंदे यांना उद्धव ठाकरे यांनीच नेता म्हणून नियुक्त केलं होतं. शिंदे यांना ठाकरेंनीच आपल्या कॅबिनेटमध्ये मंत्री केलं होतं. ठाकरेंनीच शिंदेंना निवडणूक लढवण्यासाठी एबी फॉर्म दिले होते, मग ठाकरे हे पक्षाचे अध्यक्ष नाहीत असं कसं म्हणता येईल? शिवसेनेवर शिंदे दावा कसा पान २ वर

### वेधक

## अभिजित दिपके यांची घोषणा

**छत्रपती संभाजीनगर :** नीट पेपरफुटीविरोधातील तब्बल ३७ दिवसांच्या आंदोलनानंतर सीजेपीने आपल्या पुढील लढ्याची दिशा स्पष्ट केली आहे. प्रत्यक्ष निवडणूक राजकारणात न उतरता देशातील व्यवस्था बदलासाठी आणि जनतेच्या हक्कांसाठी भक्कम दबाव गट म्हणून काम करण्याचा निर्णय घेतल्याची महत्त्वपूर्ण घोषणा संघटनेचे संस्थापक अभिजित दिपके यांनी केली. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित बैठकीपूर्वी पत्रकारांशी संवाद साधताना दिपके यांनी सीजेपीच्या आगामी आंदोलनांची दिशा स्पष्ट केली. केंद्र सरकारचे इथेनॉलमिश्रित इंधन ई-२० धोरण, देशातील वाढती बेरोजगारी आणि झारखंडमधील स्पर्धा परीक्षांमधील कथित गैरव्यवहाराविरोधात पान २ वर

## सर्वसामान्यांना पुन्हा फटका?

**नवी दिल्ली :** इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे जागतिक इंधन पुरवठा साखळीवर परिणाम झाला आहे. याचा फटका भारतासह अनेक देशांना बसला आहे. अशातच आता आगामी काळात भारतातील सिलिंडरच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकार ३.९९ लाख कोटी रुपये उभारण्याच्या योजनेवर विचार करत आहे. यासाठी एलपीजी आणि नैसर्गिक वायू वापरणाऱ्या ग्राहकांकडून अतिरिक्त शुल्क आकारण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे समोर आले आहे. मात्र याबाबत केंद्र सरकारकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. समोर आलेल्या अहवालानुसार, एलपीजी आणि नैसर्गिक वायू वापरणाऱ्या ग्राहकांवर अतिरिक्त शुल्क लादून सुमारे ४२ अब्ज डॉलर उभारण्याचा प्रस्ताव आहे.

## विमा नाही, तर पेट्रोल नाही!

**नागपूर :** विमाविना धावणाऱ्या वाहनांवर आळा घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. वैध थर्ड पार्टी विमा नसलेल्या वाहनांना पेट्रोल पंपावर इंधन नाकारण्याची व्यवस्था करण्याबाबत पथदर्शी प्रकल्प राबविण्याची शिफारस न्यायालयाने केली आहे. यासाठी विमा नियामक प्राधिकरण आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने संयुक्तपणे योजना तयार करावी, असे निर्देश दिले. न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय देताना हा सक्तीचा आदेश नसून धोरणात्मक शिफारस असल्याचेही स्पष्ट केले. रस्ते सुरक्षेला बळकटी देण्यासाठी विद्यमान एएनपीआर कॅमेरे विमा माहिती केंद्र आणि वाहन पोर्टलशी जोडण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.

### पद्मश्री डॉ. डी.वाय.पाटील यांना

# अखेरचा निरोप

**प्रेरणादायी पर्वाचा अंत**

**सर्व पक्षीय नेत्यांची उपस्थिती**

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**

शिक्षण, आरोग्य आणि समाजकारण अशा विविध क्षेत्रांत आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारे, त्रिपुरा, बिहार आणि पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल, पद्मश्री डॉ. ज्ञानदेव यशवंत पाटील (वय ९१) यांचे मंगळवारी (दि.४) सकाळी कोल्हापुरात निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रासह देशातील शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात शोककळा पसरली आहे. एका साध्या शेतकरी कुटुंबातून प्रवास सुरू करून राज्यपालपदापर्यंत मजल मारलेल्या डॉ. डी. वाय. पाटील यांच्या निधनाने एका प्रेरणादायी पर्वाचा अंत झाला.

डी. वाय. पाटील संस्था समूहाचे संस्थापक, त्रिपुरा, बिहार आणि पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील



### यशवंत निवास येथे अंतिम दर्शन

डॉ. डी.वाय. पाटील यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी बुधवार, ५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत शहरातील कसबा बावडा, कोल्हापूर येथील यशवंत निवास येथे ठेवण्यात आले होते. यावेळी कोल्हापूरकर तसेच डॉ. डी.वाय. पाटील यांच्यावर प्रेम करणारे कार्यकर्ते, विद्यार्थी, शिक्षण क्षेत्रातील व्यक्ती आणि नागरिकांनी त्यांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन घेतले.

(वय ९१) यांच्यावर आज, बुधवारी शासकीय इतमातात अंत्यसंस्कार करण्यात आले. सायंकाळी ६.१५ वाजता कसबा बावडा पॅव्हेलियन मैदानावर डी. वाय. पाटील संस्था समूहाचे प्रमुख पान २ वर

# जंतर-मंतरवर नवी मुंबई भूमीपुत्रांचा एल्गार

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला स्व. दिबांचे नाव देण्याची मागणी**

**। खांदा । वार्ताहर ।**

पाच वर्षे आश्वासनांचा पाऊस... पण निर्णयाचा दुष्काळ! नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते माजी खासदार दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने भूमिपुत्रांचा संताप अखेर दिल्लीच्या जंतर-मंतरवर धडकला.



दिबांची वारी, दिल्लीच्या दारी, या घोषणांनी बुधवारी जंतर-मंतर परिसर दणाणून सोडत रायगड, मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि पालघर या पाचही जिल्ह्यांतील शेकडो भूमिपुत्रांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार एल्गार पुकारला. जासई ते दिल्ली अशी दिंडी यात्रा काढत भूमिपुत्रांनी हजारो किलोमीटरचा प्रवास करून राजधानी गाठली. बस, रेल्वे आणि विमानाने आंदोलनकर्ते दिल्लीमध्ये दाखल झाले होते. यामध्ये महिलांचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. दि. बा. पाटील यांचे नाव द्या, भूमिपुत्रांच्या अस्मितेचा सन्मान करा अशा घोषणांनी जंतर-मंतर परिसर दुमदुमून गेला. या आंदोलनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सत्ताधारी महायुती आणि महाविकास आघाडीतील अनेक खासदार, आमदार तसेच विविध पक्षांचे लोकप्रतिनिधी आंदोलनाच्या व्यासपीठावर उपस्थित राहून भूमिपुत्रांच्या मागणीला जाहीर पाठिंबा देत होते. त्यामुळे नवी मुंबई विमानतळाच्या नामकरणाचा प्रश्न हा केवळ राजकीय विषय नसून भूमिपुत्रांच्या अस्मिता आणि स्वाभिमानाचा प्रश्न असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय पान २ वर

# मासेमारीला बंदी असतानाही समुद्रात घुसखोरी

**मत्स्यव्यवसाय विभागाची धडक कारवाई**

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

मत्स्य उत्पादन वाढीसाठी शासनाने पावसाळ्यात मासेमारीवर बंदी घातलेली असतानाही या बंदीची पायमल्ली करून अनधिकृतपणे मासेमारी करणाऱ्या सात मच्छिमार बोटीवर मत्स्यव्यवसाय विभागाने कारवाई केली आहे. ताब्यात घेण्यात आलेल्या या बोटी पुढील दंडात्मक कारवाईसाठी विविध बंदरांमध्ये ठेवण्यात आल्या आहेत.



मत्स्यव्यवसाय विभागाच्या आयुक्त प्रेरणा देशभ्रतर, सहआयुक्त महेश देवरे आणि प्रादेशिक उपायुक्त नवनाथ भादुले यांच्या मार्गदर्शनाखाली उरण परवाना अधिकारी सुरेश बावूलगावे यांच्या पथकाने ही कारवाई केली. पावसाळी काळात मासेमारीला शासनाने बंदी घातली आहे.

या कालावधीत मासेमारी केल्यास समुद्रातील मत्स्यसंपदेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने बंदी लागू करण्यात येते. मात्र, बंदी असतानाही काही मच्छिमारांकडून चोरट्या मार्गाने समुद्रात जाऊन अनधिकृत मासेमारी सुरू असल्याचे विभागाच्या निदर्शनास आले. यानंतर मत्स्यव्यवसाय विभागाच्या पथकाने समुद्रात गस्त वाढवून अनधिकृत मासेमारी करणाऱ्या बोटींची तपासणी सुरू केली. या कारवाईदरम्यान सात मच्छिमार बोटी ताब्यात घेण्यात पान २ वर

# रिलायन्सविरोधात ग्रामस्थांचा आक्रोश

**कुहिरे गेट आंदोलन चिघळणार**

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

भारत देशातील नामवंत उद्योग समूह असलेल्या धीरूभाई अंबानी यांच्या अंबानी समूहातील नागोठणे मॅन्युफॅक्चरिंग डिव्हिजन अंतर्गत रिलायन्स समूहाचा सुमारे ७० हजार कोटी रुपयांच्या नवीन प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर सुरू असतांनाच उर्वरित हजारो प्रकल्पग्रस्तांना रिलायन्स प्रशासन व शासनाने वाऱ्यावर सोडले आहे. त्यातच कुहिरे येथे नव्याने उभारण्यात आलेल्या प्रवेशद्वाराला अनेक कारणास्तव कुहीरे ग्रामस्थांचा तीव्र विरोध असतानाही रिलायन्स प्रशासनाची मनमानी सुरू असल्याने संतप्त झालेल्या कुहिरे गावातील ग्रामस्थांनी व महिलांनी आक्रोश केला आहे. कुहिरे गेट बंद न केल्यास उग्र ठिय्या आंदोलन करू, असा इशारा ग्रामस्थांनी दिला असल्याने कुहिरे गेट प्रकरण आता चिघळणार असल्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.



### ठिय्या आंदोलनाचा इशारा

रिलायन्स कंपनीला किंवा कंपनीच्या विस्तारित प्रकल्पाला आमचा विरोध नाही. कंपनीने हा गेट १०० मीटर पुढे किंवा मागे हलवावा, अशी कुहिरे ग्रामस्थांची रास्त मागणी आहे. मात्र, जर रिलायन्सने जबरदस्तीने हा गेट कुहिरे गावावर लादण्याचा प्रयत्न केला, तर गावातील आम्ही सर्व ग्रामस्थ व महिला गेटसमोर ठिय्या आंदोलन करू. या आंदोलनातून काही नुकसान वा जीवितहानी झाल्यास त्याला सर्वस्वी रिलायन्स प्रशासन व सरकारी यंत्रणा जबाबदार असेल, असा स्पष्ट इशारा कुहिरेतील संतप्त ग्रामस्थ व महिलांनी दिला आहे.

रिलायन्स कंपनीने बायोगॅस व रिलायन्स अंतर्गत विस्तारीत प्रकल्पासाठी सुमारे ७० हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यासाठी रिलायन्स प्रशासनाने जामनगर सारखा नागोठणे पान २ वर

# धरणात बुडून तरुणाचा मृत्यू

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील कार्ले येथील रामधरणेश्वर धरणातील पाण्यात बूडून तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना बुधवारी (दि.५) सकाळी घडली असून याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, निहाल विजय शेट्टी (२६) असे या मृत तरुणाचे नाव आहे. हा तरुण अलिबागमधील मेटपाडा येथील रहिवासी आहे. तो त्यांच्या अन्य मित्रमंडळींसमवेत कार्ले परिसरातील रामधरणेश्वर धरणाजवळ फिरण्यासाठी गेले होते. त्या धरणातील पाण्यामध्ये नेहाल या तरुणाला पोहण्याचा आनंद निर्माण झाला. तो पाण्यामध्ये पोहू लागला. मात्र पाण्याच्या पातळीचा अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडाला. या घटनेची माहिती पोलिसांनी मिळताच त्याला बेशुध्द अवस्थेत अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आणले. मात्र त्याचा अगोदरच पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. मात्र या तरुणाच्या मृत्यूबाबत त्याच्या वडिलांनी संशय व्यक्त केला आहे. त्यामुळे चौकशी करून गुन्हा दाखल करण्यात याव, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# १४५ गावांना उधाणाचा धोका

**बारा वेळा साडेचार मीटरपेक्षा उंच लाटा उसळणार**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये ऑगस्ट व सप्टेंबर या दोन महिन्यात १२ वेळा उंच लाटा उसळणार आहेत. खाडी व समुद्रकिनारी राहणाऱ्या १४५ गावांना त्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या कालावधीत साडेचार मीटरपेक्षा अधिक उंच लाटा किनाऱ्यांवर धडकणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहवे असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून करण्यात आले आहे.



रायगड जिल्ह्याला २४० किलोमीटरचा समुद्र किनारा लाभला आहे. अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, रोहा, पनवेल, पेण आदी तालुक्यातील असंख्य गावे, समुद्रकिनारी व खाडी किनारी आहेत. अतिवृष्टीसह उधाणाचे संकट जिल्ह्याला कायमच असते. अलिबाग तालुक्यातील अनेक गावांना उधाणाचा फटका कायमच बसत आला आहे. विशेष म्हणजे खारेपाटातील अनेक गावांमध्ये उधाणाचे पाणी शिरण्याची भिती असते. पावसाळ्यात समुद्राला मोठे उधाण येते. उधाणामुळे समुद्र किनाऱ्यावर उसळणाऱ्या लाटांमुळे समुद्राचे पाणी किनारी भागातील गावांमध्ये शिरण्याची भिती असते. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडील वेळापत्रकानुसार पान २ वर

# कुंभे धरणासह धबधब्यावर 'नो एंट्री'

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील कुंभे धरणासह धबधब्याच्या परिसरात पर्यटकांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. माणगावचे उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप यांनी मनाई आदेश जारी केला आहे. हा आदेश २९ सप्टेंबरपर्यंत असल्याचे सांगण्यात आले आहे.

जिल्हयात सध्या पावसाळी हंगाम सुरु आहे. या पावसामुळे अनेक धरणे पाण्याने भरले आहेत. धबधब्यांमध्येही पाणीही वाढले आहे. माणगाव परिसरातील कुंभे केळगण घाट, कुंभे धरण आणि बोगदा हे पावसाळी हंगामात पर्यटनाच्या आकर्षणाचे ठिकाण आहे. पुणे, मुंबईसह वेगवेगळ्या जिल्ह्यातील राज्यातील पर्यटक या धरणांसह धबधब्यांजवळ फिरण्यासाठी येतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी या परिसरात होते. कुंभे धरण आणि धबधबा हे निसर्गाच्या सानिध्यात असून दुर्गम भागात आहे. त्यामुळे त्याठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजनांचा अभाव आहे. सेल्फी काढण्याबरोबरच पाण्यात मौजमजा करण्याचा आनंद पर्यटक मनमुरादपणे घेतात. कुंभे घाट हा धोकादायक वळणाचा व तीव्र उताराचा आहे. त्या ठिकाणी दरड कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे जीवीतहानीचा धोका टाळण्यासाठी माणगावचे उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप यांनी धरण, धबधबा परिसरात मनाई आदेश दिले आहेत. धरण, धबधबा व तलावाच्या एक किलोमीटर परिसरात दुचाकी, तीन चाकी, चार चाकी व सहा चाकी वाहनांना प्रवेशबंदी आहे.

**जिल्हा रुग्णालयात पहिल्यांदाच यशस्वी ब्रेन सर्जरी | डॉ. कृष्णमूर्ती कोकणकर आणि संपूर्ण टिमचे यश**

# दोन तासांची शर्थ अन् मृत्यूवर मात!

**। वाघ्रण । प्रतिनिधी ।**

अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. जिल्हा रुग्णालयात प्रथमच महिलेच्या मेंदूवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली असून, न्यूरो सर्जरी विभागातील वैद्यकीय पथकाच्या या कामगिरीचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे. या यशामुळे गंभीर मेंदूविकारांवरील उपचारांसाठी जिल्ह्यातील रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. नवगाव-अलिबाग येथील कविता अभिजीत खिंजी (वय ३७) यांचा आठ दिवसांपूर्वी स्कूटीचा अपघात



झाला होता. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. डोक्यात मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्यांना बेशुद्ध अवस्थेत अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयातील न्यूरो सर्जरी विभागात त्यांच्यावर तातडीने उपचार सुरू करण्यात आले.

न्यूरो सर्जन डॉ. कृष्णमूर्ती कोकणकर यांनी वैद्यकीय पथकाच्या मदतीने रुग्णाची तपासणी केली असता, डोक्याला झालेल्या गंभीर दुखापतीमुळे मेंदूमध्ये रक्तस्राव होऊन रक्ताची गाठ तयार झाल्याचे निदर्शनास आले. या गाठीचा मेंदूवर मोठा दबाव निर्माण झाल्याने रुग्ण बेशुद्ध असल्याचे स्पष्ट झाले. रुग्णाची गंभीर अवस्था लक्षात घेता तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. नातेवाईकांना परिस्थितीची संपूर्ण माहिती देऊन आवश्यक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर रुग्णाला शस्त्रक्रिया विभागात हलवण्यात आले.

अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील आणि निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शितल जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. कृष्णमूर्ती कोकणकर यांनी शस्त्रक्रिया सुरू केली. तब्बल दोन तास चाललेल्या या शस्त्रक्रियेत डॉ. सविता नल्लामडगे, डॉ. हिरालाल कांबळे, डॉ. शितल कोकणकर, डॉ. मयुरी कांबळे यांच्यासह वैद्यकीय पथकाने महत्त्वपूर्ण सहकार्य केले. शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर रुग्णाला पुढील १२ तास व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. त्यानंतर त्यांच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होत गेली आणि रुग्ण शुद्धीवर आल्या.

सध्या त्यांची प्रकृती वैद्यकीय पथकाच्या देखरेखीखाली असल्याचे सांगण्यात आले. जिल्हा रुग्णालयात प्रथमच मेंदूवरील अशा प्रकारची यशस्वी शस्त्रक्रिया झाल्याने अलिबाग आणि रायगड जिल्ह्यातील गंभीर मेंदूविकाराच्या रुग्णांसाठी ही बाब महत्त्वाची मानली जात आहे.

# कोट्यवधींची विद्युतदाहिनी धूळखात

**माणगावकरांच्या पैशांची राख**

**। माणगाव । सलीम शेख ।**

पर्यावरणपूरक अंत्यसंस्काराची सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी माणगाव नगरपंचायतीने केंद्र व राज्य शासनाच्या योजनेंतर्गत कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उभारलेली विद्युतदाहिनी गेल्या तब्बल पाच वर्षांपासून बंद अवस्थेत पडून आहे. अत्याधुनिक सुविधा म्हणून उभारण्यात आलेला हा प्रकल्प आज स्वतःच धूळ, गंज आणि निष्क्रियतेच्या विळख्यात अडकला असून शासनाच्या निधीची अक्षरशः राखरांगोळी झाल्याचे चित्र समोर आले आहे.

शहरातील नागरिकांना लाकडावरील पारंपरिक अंत्यसंस्काराला पर्याय म्हणून आधुनिक, प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक सुविधा उपलब्ध व्हावी, वृक्षतोड कमी व्हावी तसेच अंत्यसंस्कार प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी या उद्देशाने विद्युतदाहिनीची उभारणी करण्यात आली होती. मात्र उद्घाटनाच्या प्रतीक्षेतच हा प्रकल्प वर्षानुवर्षे रखडला आणि अखेर पूर्णपणे बंद पडला.

### विद्युतदाहिनी सुरू होणार कधी?

पाच वर्षांहून अधिक काळ बंद पडलेल्या विद्युतदाहिनीमुळे नागरिकांना आजही पारंपरिक पद्धतीनेच अंत्यसंस्कार करावे लागत आहेत. शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेचे हे अपयश ठरत असून, संबंधित यंत्रणा नेमकी कधी कार्यान्वित होणार आणि जबाबदारांवर कारवाई कधी होणार, याकडे संपूर्ण माणगाव तालुक्याचे लक्ष लागले आहे.

या प्रकल्पाबाबत तत्कालीन नगराध्यक्ष, नगरसेवक आणि अनेक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी विद्युतदाहिनी तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती. मात्र प्रशासन आणि संबंधित यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे आजही हा प्रकल्प सुरू होऊ शकलेला नाही. परिणामी आत बसविण्यात आलेली महागडी यंत्रसामग्री धूळखात पडली असून अनेक भागांवर गंज चढला आहे. तांत्रिक यंत्रणा निकामी होण्याच्या मार्गावर असल्याने पुन्हा ती कार्यान्वित करण्यासाठी मोठा अतिरिक्त खर्च करावा लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

याबाबत माणगाव नगरपंचायतीचे पान २ वर

## पान १ वरून

## शिंदेंचं संपूर्ण सरकारच बेकायदेशीर

सांगू शकतात? असा सडेतोड युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला आहे. तसेच एकनाथ शिंदे यांनी पक्ष फोडून स्थापन केलेलं सरकारच बेकायदेशीर असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. यादरम्यान, पक्षचिन्ह राजकीय पक्षाचं की विधिमंडळ पक्षाचं हाच खरा प्रश्न आहे, असं विधान सर्वोच्च न्यायालयाने केले. या खटल्याची आजची सुनावणी संपली असून, आता गुरुवारी दुपारी २ वाजता पुन्हा एकदा सुनावणीला सुरुवात होणार आहे.

कपिल सिब्बल यांनी आज सुप्रीम कोर्टात जोरदार युक्तिवाद केला आहे. जोपर्यंत पक्ष एबी फॉर्म देत नाही, तोपर्यंत ती व्यक्ती पक्षाची अधिकृत उमेदवार होऊ शकत नाही. निवडणूक लढवण्यासाठी अर्ज कोणीही दाखल करू शकतं. पण एबी फॉर्म शिवाय त्याला पक्षाची मान्यता देत नाही. राजकीय पक्ष संघटनेच्या नियुक्त्या करतो, राज्यभरात पदाधिकारी नेमतो आणि उमेदवारांना तिकीट देखील देतो, म्हणून पक्षात संघटना ही सर्वात वर येते, असं सांगतानाच २०१३ आणि २०१८ चं संविधान चुकीच होतं, असं निवडणूक आयोग म्हणत असेल तर २०१४ आणि २०१९ ची निवडणूकही चुकीची आहे, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला. निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांना पक्ष देण्याचा घेतलेला निर्णय पाहता हे सिब्बल यांचं हे मोठं विधान मानलं जात आहे.

## पद्मश्री डॉ. डी.वाय. पाटील यांना अखेरचा निरोप

संजय डी. पाटील यांनी डी. वाय. पाटील यांच्या पार्थिवाला अग्नी दिला. गेल्या १० दिवसांपूर्वी पाटील यांना हृदयविकाराचा झटका आला होता. त्यामुळे त्यांची तब्येत खालावली होती. निवासस्थानातच सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध असल्याने त्यांच्यावर घरीच उपचार सुरु होते. अखेर मंगळवारी सकाळी त्यांचे निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी शांतादेवी पाटील, डी. वाय. पाटील संस्था समूहाचे प्रमुख संजय डी. पाटील, आमदार सतेज पाटील, मुलगी भाग्यश्री पाटील, राजश्री काकडे, सुप्रिया चव्हाण पाटील, मुलगा विजय पाटील, अजिंक्य पाटील (मुंबई) आणि मुली डॉ. नंदिता पालशेतकर, डॉ. पूजा चोलेरा यांच्यासह मोठा परिवार आहे. डॉ. पाटील यांच्या निधनाचे वृत्त कळताच कोल्हापूर शहर आणि परिसरातून विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि कार्यकर्त्यांनी सतेज पाटील यांच्या कसबा बावडा येथील निवासस्थानाकडे धाव घेतली. कसबा बावडा ग्रामस्थांनी दुकाने आणि अन्य व्यवहारही बंद ठेवले होते. डी. वाय. पाटील समूहाच्या आठ विद्यापीठे आणि १८२ इन्स्टिट्यूटमधील कामकाज बंद ठेवून पाटील यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे संस्थापक, ज्येष्ठ नेते आणि बिहारचे माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांचे काल निधन झाले. त्यांच्या निधनामुळे शिक्षण, सहकार आणि राजकारण क्षेत्रातील एका युगाचा अंत झाला आहे. बुधवारी सायंकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यापूर्वी त्यांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन घेण्यासाठी विविध क्षेत्रातील दिग्गजांनी मोठी गर्दी केली होती. डॉ. पाटील यांचे पार्थिव कसबा बावडा येथील निवासस्थानी ठेवण्यात आले होते. आज सकाळपासून अंत्यदर्शन घेण्यासाठी सामान्य नागरिकांपासून मान्यवरांनी उपस्थिती लावली होती.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यासह अनेक प्रमुख राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी अंत्यदर्शन घेतले. यावेळी त्यांनी डॉ. पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या व्यापक सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय कार्याला आदरांजली वाहिली. तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाचा विस्तार पोहोचवणारे डॉ. डी. वाय. पाटील यांनी महाराष्ट्रात आणि देशाबाहेरही उच्च शिक्षणाचा भक्कम पाया रचला. त्यांच्या जाण्याने राज्याने एक दूरगामी विचार करणारा मार्गदर्शक गमावला आहे, अशा शब्दांत मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

अंत्यदर्शन घेणाऱ्यांमध्ये खासदार शाहू महाराज, पालकमंत्री प्रकाश आबिटकर, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, उद्योगमंत्री उदय सामंत, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, वनमंत्री गणेश नाईक, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, निवृत्त न्या. बी. जी.कोळसे पाटील, विधान परिषद माजी विरोधीपक्ष नेते आमदार अंबादास दानवे, तसेच अमित देशमुख, विश्वजीत कदम, राजेंद्र पाटील यड्रावकर, चंद्रदीप नरके, अमल महाडिक, शिवाजी पाटील, अशोक माने, हेमंत ओगले, यशोमती ठाकूर, आदी आमदार, माजी खासदार निवेदिता माने, संजय मंडलिक, कर्नाटकचे माजी मंत्री आर.एम. पाटील, माजी मंत्री वीरकुमार पाटील, राजेश कदम, लक्ष्मणराव चिंगळे, महापौर रूपाराणी निकम,कुलगुरू डॉ. रजनीश कामत, अभिनेते सयाजी शिंदे, भरत जाधव, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे गुरुदीप सफल, प्रणव झा, बी एन संदीप, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ, आमदार विजय वडेट्टीवार, सचिन सावंत, माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री सुनील केदार, माजी मंत्री बाळासाहेब पाटील आदींचा समावेश होता.

## रिलायन्सविरोधात ग्रामस्थांचा आक्रोश

परिसराचा विकास करू असे गजर स्थानिकांना दाखविले आहे. मात्र रिलायन्स प्रशासनाचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे अशी परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. विस्तारित प्रकल्पाचे काम सुमारे ५ वर्षे चालणार असतांनाच कंपनीने उर्वरित प्रकल्पग्रस्त व स्थानिक नागरिकांना वाऱ्यावर सोडल्याचे दिसून येत आहे. रिलायन्स कंपनीने काही मोजक्याच जुन्या ठेकेदारांना व पुढाऱ्यांना हाताशी धरून स्थानिक लोकांना रोजगाराचे कोणतेही साधन न देता बाहेरील व्यक्तींना छोटे मोठे अनेक प्रकारचे ठेके दिले असल्याचे दिसून येत आहे.

रिलायन्स कंपनीने कुहिरे येथे उभारलेल्या नवीन गेटला स्थानिक ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. ग्रामस्थांना कोणत्याही प्रकारे विश्वासात न घेता या गेटची उभारणी करण्यात आली आहे. वाढत्या अवजड वाहतुकीमुळे येथील ग्रामस्थांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, असा गंभीर आरोप कुहिरे ग्रामस्थांनी केला आहे. रिलायन्स कंपनीच्या या मनमानी कारभाराविरोधात सर्व ग्रामस्थ एकवटले असून गावातील महिलांनी अतिशय आक्रमक पवित्रा घेतला आहे.

**रिलायन्सकडे ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या**

रोजगाराचा प्रश्न सोडवा : कुहिरे गावासमोरील या गेटमुळे रोजगाराचे साधन निर्माण करणाऱ्या येथील छोट्या विविध प्रकारच्या टपऱ्या, छोट्या हॉटेल्सवर उदरनिर्वाह करणाऱ्या स्थानिक, गोरगरीब लोकांचा रोजगार हिरावला जाणार आहे. ज्या स्थानिकांच्या जमिनी प्रकल्पात गेल्या, त्यांना आणि त्यांच्या मुलांना रोजगार न देता इतर ठिकाणच्या लोकांना नोकऱ्या दिल्या जात आहेत.

**गतिरोधक उभारा :** कुहिरे गावच्या थांब्यासमोरच शाळकरी मुले बसेसमधून चढत उतरत असतात. या रस्त्यावरून रिलायन्सच्या विस्तारित प्रकल्पासाठी मालवाहतूक करणारी अनेक मोठ मोठी वाहने भरधाव वेगाने ये जा करीत असतात.

मात्र या ठिकाणी एकही गतिरोधक नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. काही दिवसांपूर्वीच याठिकाणी एका तरुणाचा अपघात झाला होता, ज्याची कंपनीने दखल घेतली नाही. त्यामुळे कुहिरे थांब्याजवळ कंपनीने तत्काळ गतिरोधक उभारावेत.

**रिलायन्स विरोधात ग्रामस्थांचे आरोप**

रिलायन्सच्या इस्टेट ऑफिसमध्ये झालेल्या बैठकीत गेटबाबत कोणताही सकारात्मक निर्णय किंवा आश्वासन देण्यात आले नाही. कुहिरे ग्रामपंचायतीची परवानगी न घेता सिमेंट काँक्रीटचा रस्ता आणि ग्रील उभारण्यात आले आहे. तसेच याप्रकरणी विरोध करणाऱ्या तरुणांचे गेटपास बंद केले जात आहेत आणि त्यांच्या घरच्यांवर दबाव टाकला जात असल्याचा आरोपही ग्रामस्थ करीत आहेत. काही दिवसांपूर्वीच रिलायन्सच्या एका बड्या अधिकाऱ्याकडून महिलेची छेडछाड करण्याचा प्रकार घडल्याची व याप्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची घटना ताजी असतानाच रिलायन्सच्या विस्तारित प्रकल्पातील कर्मचारी अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन महिलांचे पाठीमागून अश्लील व्हिडिओ काढत असल्याचा आणि शिट्ट्या मारत असल्याचा संतापजनक व गंभीर आरोप स्थानिक महिलांनी केला आहे. महिलांनी छेडछाडीचे केलेले आरोप धक्कादायक आहेत. एवढी मुजोरी यांना येते कुठून? हा देखील प्रश्न उपस्थित होत आहे.

## जंतर-मंतरवर नवी मुंबई भूमीपुत्रांचा एल्गार

विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठराव मंजूर करून तो केंद्र सरकारकडे पाठविल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, केंद्रीय मंत्रिमंडळाकडून अद्याप या प्रस्तावाला मंजुरी मिळालेली नाही. नामकरणाचा निर्णय प्रलंबित असतानाच विमानतळावरून आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्यात आल्याने भूमिपुत्रांच्या भावना दुखावल्याची तीव्र प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. नामकरणाच्या मागणीसाठी यापूर्वी २४ जून रोजी चिंचपाडा येथे उपोषण, त्यानंतर ८ जुलै रोजी पनवेल ते मंत्रालय पायी मोर्चा काढण्यात आला होता. या आंदोलनादरम्यान काही आंदोलनकर्त्यांना अटकही झाली. मात्र, त्यानंतरही ठोस निर्णय न झाल्याने भूमिपुत्रांनी अखेर मुंबई-महाराष्ट्राची सीमा ओलांडून थेट दिल्ली गाठण्याचा निर्णय घेतला. मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी यापूर्वी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणाचा अंतिम निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी घेतील, असे स्पष्ट केले होते. तसेच राज्य सरकारने दि. बा. पाटील यांच्या नावाचाच एकमेव प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविल्याचेही वारंवार सांगितले जात आहे. मग राज्य सरकारचा प्रस्ताव केंद्राकडे पोहोचूनही अद्याप निर्णय का होत नाही? असा थेट सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला.

**मग दिबांच्या नावाला विलंब का?**

आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकारसमोर आणखी एक बोचरा प्रश्न उपस्थित केला. गोव्यातील विमानतळाला माजी मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांचे नाव देण्याचा निर्णय अल्पावधीत होऊ शकतो, तर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा प्रस्ताव वर्षानुवर्षे का रखडला? राज्य सरकारने ठराव मंजूर करून प्रस्ताव केंद्राकडे पाठविल्यानंतरही नामकरणाचा निर्णय प्रलंबित राहणे म्हणजे भूमिपुत्रांच्या भावनांकडे दुर्लक्ष असल्याची संतप्त भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. आता आश्वासन नको, निर्णय हवा! असा निर्धार व्यक्त करत भूमिपुत्रांनी केंद्र सरकारला थेट दिल्लीच्या दारी जाब विचारला आहे.

## कोट्यवधींची विद्युतदाहिनी धूळखात

मुख्याधिकारी संतोष माळी यांनी सांगितले की, संबंधित ठेकेदाराला अनेक वेळा दूरध्वनीद्वारे तसेच लेखी पत्रव्यवहार करून काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र त्याने अद्यापही काम पूर्ण केलेले नाही.

दरम्यान, या प्रकरणाची अधिक माहिती घेतली असता संबंधित ठेकेदार हा बाहेरील जिल्ह्यातील असून, काम पूर्ण होण्यापूर्वीच त्याला बहुतांश बिलाची रक्कम अदा करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

त्यामुळे उर्वरित काम पूर्ण करण्यास तो सातत्याने टाळाटाळ करत असल्याचा आरोप होत आहे. यामुळे कामाच्या मंजुरीपासून ते देयक अदा करण्यापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणीही आता जोर धरू लागली आहे. नागरिकांनी या प्रकरणात संबंधित ठेकेदाराविरुद्ध माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याच्याकडून झालेल्या आर्थिक नुकसानीची वसुली करावी, तसेच निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दंडात्मक आणि प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. सरकारने पर्यावरण संरक्षण, प्रदूषण नियंत्रण आणि वृक्षतोड कमी करण्याच्या उद्देशाने राज्यभर विद्युतदाहिनी प्रकल्पांना प्रोत्साहन दिले. मात्र माणगावातील हा प्रकल्प प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे निष्प्रभ ठरला आहे.

नागरिकांना अपेक्षित सुविधा मिळाली नाहीच, उलट कोट्यवधी रुपयांचा सार्वजनिक निधी वाया गेला. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि विद्युतदाहिनी तातडीने सुरू करून नागरिकांच्या सेवेत उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी माणगावकरांकडून होत आहे.

## मासेमारीला बंदी असतानाही समुद्रात घुसखोरी

आल्या आहेत. यामध्ये दर्शन अमरनाथ (मालक- सोमनाथ नारायण कोळी), तुंगा (मालक-भावसिंग वाळू राठोड), गंगा (मालक- श्रीनिवास गंगाराम राठोड), उमा गौराई (मालक-हरेश्वर शिवाजी कोळी), आई भवानी (मालक-गणेश लालू राठोड), लक्ष्मी नारायण (मालक-विनोद नरेश राठोड), विघ्नहर्ता (मालक- जयश्री हिराजी कोळी) या सात मच्छिमार बोटींचा सम ावेश असल्याची माहिती उरण परवाना अधिकारी सुरेश बावूलगावे यांनी दिली. ताब्यात घेण्यात आलेल्या मच्छिमार बोटी पुढील दंडात्मक कारवाईसाठी विविध बंदरात ठेवण्यात आलेल्या आहेत. बंदी मोडणाऱ्यांवर कारवाईचा बडगा पावसाळी मासेमारी बंदीच्या काळात नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर यापुढेही कारवाई सुरूच राहणार असल्याचे मत्स्यव्यवसाय विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे बंदीच्या कालावधीत अनधिकृत मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांमध्ये विभागाच्या कारवाईमुळे खळबळ उडाली आहे.

## निना वनगेंनी घेतली एसपींची भेट

तपास सुरू असून, सर्व आरोपींना लवकरच अटक केली जाईल, अशी ग्वाही दिल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली आहे. पतीला अतिशय क्रूर पणे मारहाण झाली आहे. मला या प्रकरणी न्याय हवा, अशी मागणी निना वनगे यांनी केली आहे.

या मारहाणीच्या घटनेत रिव्हॉल्व्हरचा वापर झाल्याचा गंभीर आरोप फिर्यादीकडून करण्यात आला आहे. या आरोपांची सत्यता, प्रत्यक्षात रिव्हॉल्व्हरचा वापर झाला होता का आणि झाला असल्यास संबंधित शस्त्र कुठून आले, याचा तपास पोलीस करत आहेत. या सर्व बाबींचा तपास पूर्ण झाल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. सध्या या प्रकरणातील आरोपींचा शोध आणि पोलीस कारवाईकडे पेणसह संपूर्ण परिसराचे लक्ष लागून राहिले आहे.

## १४५ गावांना उधाणाचा धोका

ऑगस्ट व सप्टेंबर या दोन महिन्याच्या कालावधीत १२ वेळा समुद्राला मोठे उधाण येणार आहे. साडेचार मीटरपेक्षा उंच लाटा किनारी आदळणार आहेत. रायगड जिल्ह्यात समुद्रकिनारी ४६ तर खाडीकिनारी ९९ अशा १४५ गावांचा समावेश आहे. समुद्र आणि खाडी किनाऱ्यावरील गावांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे. उधाणावेळी मुसळधार पाऊस पडल्यास या गावांना पूरस्थितीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. ऑगस्ट महिन्यात (दि. १२ ते १६) या पाच दिवसांच्या कालावधीत ४.५० ते ४.८३ मीटर उंच लाटा येणार आहेत. सप्टेंबर महिन्यामध्ये (दि.१० ते १३ )तसेच (दि.२८ ते ३०) या कालावधीत ४.५१ ते ४.६५ मीटर उंच लाटा उसळणार आहेत. या दोन महिन्याच्या कालावमधील तीन वेळा सर्वात जास्त उंच लाटा ऑगस्ट महिन्यामध्ये किनारी धडकणार आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी या कालावधीत सतर्क राहवे असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## अभिजित दिपके यांची घोषणा

सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. नीट पेपरफुटीच्या प्रश्नावर सुरू केलेल्या आंदोलनाला देशभरातून मिळालेल्या प्रतिसादानंतर सीजेपीने आपली भूमिका अधिक व्यापक करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, त्यासाठी थेट निवडणुकीच्या राजकारणात उतरण्याऐवजी सरकार आणि व्यवस्थेला जनतेच्या प्रश्नांवर जाब विचारणारा दबाव गट म्हणून काम करण्याची भूमिका संघटनेने घेतली आहे. सत्ता मिळवणे हा उद्देश नसून व्यवस्था बदलासाठी जनतेचा दबाव निर्माण करणे हा आमचा लढा आहे, अशी भूमिका दिपके यांनी मांडली.

# कामोठ्यात पाणीप्रश्नी निर्णायक बैठक

**| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |**

कामोठे परिसरात २४ तास नियमित पाणीपुरवठा आणि टँकरमुक्त कामोठे या नागरिकांच्या प्रमुख मागण्यांबाबत आज कामोठे पोलीस ठाण्यात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला पोलीस प्रशासन, सिडकोचे संबंधित अधिकारी तसेच कामोठेकर शिष्टमंडळ उपस्थित होते. नागरिकांच्या वाढत्या पाणीटंचाईच्या समस्येवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान पोलीस प्रशासनाने सिडकोच्या जलविभागाला १० ऑगस्ट २०२६ पर्यंत पाणीपुरवठ्याबाबत योग्य तो निर्णय घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. निर्धारित मुदतीत ठोस निर्णय न झाल्यास त्यानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीस सिडको जलविभाग जबाबदार असेल, असेही स्पष्ट करण्यात आल्याचे बैठकीनंतर सांगण्यात आले. कामोठेकर नागरिकांची प्रमुख मागणी म्हणजे परिसरात २४ तास नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा सुरू करणे तसेच टँकरवर असलेले अवलंबित्व पूर्णपणे संपवून कामोठ्याला टँकरमुक्त करणे. नागरिकांना त्यांच्या मूलभूत हक्काचे पाणी नियमितपणे मिळाले पाहिजे, अशी भूमिका शिष्टमंडळाने बैठकीत मांडली.



बैठकीनंतर सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब सतू बुधे आणि कैलास रामचंद्र सरगर यांनी नागरिकांना शांतता राखत एकजूट कायम ठेवण्याचे आवाहन केले. पाणी हा आमचा हक्क आहे, उपकार नाही आणि एकजूट हीच आपली ताकद या घोषणांसह नागरिकांनी आपल्या न्याय्य हक्कासाठी संघटित राहण्याचे आवाहन करण्यात आले. आता १० ऑगस्टपर्यंत सिडको प्रशासन कोणता निर्णय घेते आणि कामोठेकरांच्या पाणीप्रश्नी काय तोडगा काढला जातो, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

## वीस लाख ११ हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल :** शेअर मार्केटमध्ये जास्त नफ्याचे आमिष दाखवून २० लाख ११ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपींविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी प्रेमसिंग नेगी हे सेक्टर १९, कामोठे येथे राहत असून अज्ञात इसमांनी त्यांना बेरिंग्स इन्व्हेस्टमेंट या व्हाट्सअप ग्रुपला जॉईन केले आणि त्यांना शेअर मार्केटमध्ये जास्त नफ्याचे आमिष दाखवले आणि एक लिंक पाठवली. त्यामध्ये डिमॅट खाते उघडण्यास सांगून वेळोवेळी वेगवेगळे बँक खाते दिली आणि आयपीओ मध्ये गुंतवणूक करण्यास सांगून २० लाख ११ हजार रुपयांची फसवणूक केली आणि पैसे परत केले नाहीत.

## मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** तीस वर्षीय तरुणाला ठोशाबुक्क्यांनी आणि कड्याने मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी अमित माने याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रणय अरुणे हा मित्र आणि मैत्रिणीसोबत सुकापुर येथे जेवण करत होते. यावेळी प्रणय आणि अमित सोबत कामोठे येथे नव्याने चालू करत असलेल्या पान शॉपच्या व्यवसायातील नफ्यातील टक्केवारीवरून अमितला राग आला. त्याने टेबलवर ठेवलेले कडे उचलून शिवीगाळ आणि दमदाटी केली तसेच त्याला ठोसाबुक्याने आणि कड्याने मारहाण करून जखमी केले.


### आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग, जि. रायगड
### २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना
### (फक्त सभासदांसाठी)

सप्रेम नमस्कार,

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग या संस्थेच्या सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता पी.एन.पी. नाट्यगृह चेंढरे, बायपास रोड, ता. अलिबाग, जि. रायगड या ठिकाणी खालील विषयांचा विचार करण्याकरीता आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ (अ) मधील तरतुदीनुसार सर्व सभासदांना सहकार शिक्षण व प्रशिक्षण देणे बंधनकारक असल्याने सर्व सभासदांसाठी वार्षिक सभा सुरू होण्यापूर्वी याच ठिकाणी सकाळी १०-३० ते ११.३० या वेळेत प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. तरी सर्व सभासदांनी सकाळी १०.३० वाजता सभेच्या ठिकाणी उपस्थित रहावे. प्रशिक्षणानंतर ठिक ११.३० वाजता सभेला सुरूवात होईल.

**- : सभेपुढील विषय :-**

१. मागील दि. ०२ ऑगस्ट २०२५ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे व दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या विशेष साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०२६ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या निव्वळ नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
४. सन २०२६-२७ या सालाकरीता अंदाजपत्रकास मंजुरी देणे व सन २०२५-२६ या सालाकरीता तयार केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
५. सन २०२५-२६ या सालाचा वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून आलेला तपासणी अहवाल वाचून नोंद घेणे.
६. सन २०२६-२७ या सालाकरीता अंतर्गत हिशेब तपासणीस व वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्याचे मानधन निश्चित करणे.
७. मागील वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल सादर करणे व त्यास मंजूरी देणे.
८. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९. संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरूस्तीस मंजूरी देणे.
१०. प्रशिक्षण/कर्ज/गुंतवणूक/वसुली इत्यादी तत्सम विषयांच्या आर्थिक धोरणांना मान्यता देणे.
११. संस्थेच्या वारजे पुणे शाखेसाठी जागा खरेदी करणेस मंजुरी देणे.
१२. नियम ४९ नुसार निर्लेखन कर्जास मान्यता देणे.
१३. संस्थेचे नावामध्ये बदल करणे बाबत निर्णय घेणे.
१४. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ : अलिबाग
दिनांक : ०६/०८/२०२६

मा. संचालक मंडळाच्या अनुज्ञेने
**(सौ. मीनाक्षी शामसुंदर पाटील)**
कार्यलक्षी संचालिका
आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या; अलिबाग

सभासद प्रशिक्षण- वार्षिक सभा सुरू होण्यापूर्वी त्याच ठिकाणी सकाळी १०.३० ते ११.३० या वेळेत सभासदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे. कृपया सभासदांनी स. १०.३० वाजता उपस्थित रहावे. यानंतर लगेचच वार्षिक सभेचे कामकाज सुरू होईल.

**- : सूचना :-**

१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सदरची वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्धा तास उशिरा म्हणजेच दुपारी १२.०० वाजता घेतली जाईल व या सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. ज्या सभासदांनी अजूनही आपले मोबाईल क्रमांक संस्थेकडे नोंदविले नाहीत किंवा ज्यांचे मोबाईल नंबर बदलले आहेत अशा सभासदांनी कृपया संस्थेच्या जवळच्या शाखेमध्ये संपर्क करून आपले मोबाईल नंबर अपडेट करणे व आपली केवायसी अपडेट करण्यास विनंती.
३. सन्माननीय सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या आपल्या लेखी सूचना संस्थेच्या मुख्य कार्यालयाकडे वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी किमान आठ दिवस अगोदर पाठवाव्यात.



### PANVEL MUNICIPAL CORPORATION PANVEL
### TENDER NOTICE

Tender No.: PMC/SWM/2526/119/747/ 2026 Date:05/08/2026

Online bids are invited from bidder for purchase of the following items on behalf of the Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel (here in after called the CORPORATION) and will be received online on the website www.mahatenders.gov.in as per time schedule (key dates) in the notice published on the above website. Tender are being invited in two envelope system from eligible contractors for "Providing Mechanized Fogging & Spraying Services for Panvel Municipal Corporation Area".

| Sr. No. | Name of Work | Earnest Money Money Deposit(Rs.) | Cost of tender form (Rs.) | Period of work |
|---|---|---|---|---|
| 1. | Providing Mechanized Fogging & Spraying Services for Panvel Municipal Corporation Area. | 9,56,000/- | 3,540/- | 3 Years |

Key Dates -

| Sr. No. | Description | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | Publish Date | 06/08/2026 | 12.00 |
| 2 | Document Download Start Date | 06/08/2026 | 12.00 |
| 3 | Document Download End Date | 13/08/2026 | 15.00 |
| 4 | Bid Submission Start Date | 06/08/2026 | 12.00 |
| 5 | Bid Submission End Date | 13/08/2026 | 15.00 |
| 6 | Bid Opening Date | 14/08/2026 | 15.00 |

SD/-
Additional Commissioner
Panvel Municipal corporation



### ग्रामपंचायत चिरनेर
### मु.पो. चिरनेर, ता. उरण, जि. रायगड, पिन- ४१०२०६

जावक क्र. : १९१
दिनांक : ०५/०८/२०२६

**निविदा सूचना**

ग्रामपंचायत चिरनेर खालील कामाकरीता निविदा मागवित असून त्याच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे जोडल्या आहेत.

| अ. नं. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फॉर्म मिळविण्याची मुदत | निविदा स्विकारण्याची तारीख व वेळ | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | केळ्याचा माळ वाडीवर पत्राशेड बांधणे ग्रामनिधी सन २०२५-२०२६ | २७१९८७/- | दि. ०६/०८/२०२६ ते दि. १३/०८/२०२६ | दि. १३/०८/२०२६ वेळ दुपारी १२.०० वाजता | दि. १३/०८/२०२६ वेळ दुपारी २.०० वाजता |
| २ | ग्रामपंचायत चिरनेर परशुराम म्हात्रे ते पद्माकर फोफेरकर यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. ग्रामनिधी २०२५-२०२६ | १८५०११/- | दि. ०६/०८/२०२६ ते दि. १३/०८/२०२६ | दि. १३/०८/२०२६ वेळ दुपारी १२.०० वाजता | दि. १३/०८/२०२६ वेळ दुपारी २.०० वाजता |
| ३ | बाळकृष्ण गोंधळी ते चंदन कडू यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. ग्रामनिधी सन २०२५-२०२६ | ४९९६९७/- | दि. ०६/०८/२०२६ ते दि. १३/०८/२०२६ | दि. १३/०८/२०२६ वेळ दुपारी १२.०० वाजता | दि. १३/०८/२०२६ वेळ दुपारी २.०० वाजता |

**शर्ती व अटी:-**

१. सदरचे ठेकेदार शासनाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
२. सदरचे काम केलेले अनुभवाचे दाखले जोडणे आवश्यक आहेत.
३. सदर कामाचे अडव्हान्स रक्कम देता येणार नाही. जसे काम होईल त्याप्रमाणे बिल अदा केले जाईल.
४. सदर काम तांत्रिक अधिकाऱ्याच्या देखरेखीसाठी स्पेसिफिकेशन नुसार करणेचे आहे. तसेच सदर कामावर ग्रामपंचायत कमिटीची देखरेख राहील.
५. सदरचे कामापोटी ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम बिलांतून कापली जाईल.
६. सदरच्या कामाचे तांत्रिक अधिकाऱ्याच्या मुल्यांकनानुसार कामाचे बिल अदा केले जाईल.
७. सदर कामाचे निविदा पत्रक अट नं. १ व २ या कागदपत्रांची पूर्तता केल्याखेरीज ठेकेदाराने स्वतः किंवा ठेकेदाराने नियुक्त केलेल्या प्रतिनिधीद्वारा निविदा देण्यात येईल.
८. अंतिम निविदा स्विकृतीनंतर योग्य त्या किंमतीचा दस्तऐवज ठेकेदाराने स्वतः खरेदी करून ग्रामपंचायत यांचे सोबत करारनामा करावयाचा आहे.
९. सदर कामामध्ये साहित्याच्या किंमतीचे बाजार भावामध्ये वाढ झाल्यास रेती, खडी, स्टील व सिमेंट कोणत्याही वाढीव रक्कम देण्यास ग्रामपंचायत वर बंधनकारक राहणार नाही.
१०. सुरक्षा अनामत रक्कम सदर कामाचे अंतिम बिल झाल्यानंतर ६ महिन्याचे कालावधी नंतर आदा केले जाईल.
११. कोणतेही कारण न देता एक अगर सर्व निविदा नामंजुर करण्याचा अधिकार खालील सह्या करणाऱ्याने (सरपंच यांनी) राखुन ठेवला आहे.
१२. सर्व कागदपत्र सक्षम अधिकाऱ्याकडुन साक्षांकित करून सादर करण्यात यावीत.

# माणगावात तुकाराम मुंडेंचा धसका

- **अन्नाचा दर्जा तपासण्याची व्यापाऱ्यांची धावपळ**
- **आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांवर कारवाईची मागणी**

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

राज्यात अन्न व औषध प्रशासनाच्या धडक कारवाईमुळे चर्चेत असलेले आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या संभाव्य तपासणीची चाहूल लागताच माणगावच्या बाजारपेठेत एकच खळबळ उडाली आहे. पथक कधीही तपासणीसाठी येऊ शकते, या शक्यतेने अनेक व्यापारी, हॉटेल व्यावसायिक आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी अक्षरशः धसका घेतला असून, दुकानांमधील स्वच्छता, अन्नपदार्थांचा दर्जा, परवाने, नोंदी आणि आवश्यक कागदपत्रांची लगबग सुरू झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

हॉटेल, खानावळी, बेकरी, मिठाई दुकाने, किराणा व्यापारी, चहा-नाश्त्याच्या टपऱ्या, वडापाव व फास्ट फूड विक्रेते तसेच रस्त्यालगत खाद्यपदार्थ विकणारे लहान व्यावसायिक यांच्यात विशेष सतर्कता निर्माण झाली आहे. अनेकांनी दुकानांची साफसफाई, मुदतबाह्य वस्तूंची छाननी, अन्नपदार्थांची योग्य साठवण, स्वयंपाकघरातील स्वच्छता आणि अन्नसुरक्षा नियमांचे पालन करण्यास सुरुवात केली आहे.

काही दिवसांपूर्वी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त मुंडे आणि त्यांचे पथक माणगावात तपासणीसाठी येणार असल्याची चर्चा पसरताच काही व्यापाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली होती. काही दुकाने काही काळ बंद ठेवण्यात आल्याचीही चर्चा बाजारपेठेत होती. या घटनेनंतर व्यावसायिकांमध्ये आता कोणत्याही क्षणी तपासणी होऊ शकते अशी भावना निर्माण झाली असून, नियमांचे पालन करण्याकडे अधिक गांभीर्याने पाहिले जात आहे. बाजारपेठेत अशीही चर्चा आहे की, काही व्यावसायिकांनी निकृष्ट दर्जाचा अथवा संशयास्पद माल विक्रीतून हटविला असून, आवश्यक परवाने अद्ययावत करण्यासाठी आणि कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी धावपळ सुरू केली आहे. मात्र, या बाबींची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

दरम्यान, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या, निकृष्ट दर्जाचे किंवा मुदतबाह्य अन्नपदार्थ विकणाऱ्या व्यावसायिकांविरुद्ध कठोर कारवाई व्हावी, दोषींवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी आणि अशा अचानक तपासण्या नियमितपणे सुरू राहाव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.



**नियमपालनाची सकारात्मक सुरुवात**

अन्नसुरक्षा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास प्रामाणिक व्यापाऱ्यांना संरक्षण मिळेल, ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ होईल आणि बाजारपेठेत दर्जेदार व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध राहतील, असा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत. मुंडे यांच्या कारवाईच्या धास्तीने का होईना, माणगावातील बाजारपेठेत शिस्त, स्वच्छता आणि नियमपालनाची सकारात्मक सुरुवात झाल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

# ‘स्वच्छ’ खोपोलीसाठी पालिका सरसावली

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली नगरपरिषदेच्या वतीने ‘सफाई अपनाओ, बिमारी भगाओ’ ही विशेष स्वच्छता व जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी नगराध्यक्षांनी खोपोलीतील भाजी मार्केट परिसराची पाहणी करून वाढत्या अतिक्रमणाबाबत संबंधितांना तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. भाजी मार्केटचे नियोजनबद्ध पुनर्विकास करून ते अधिक स्वच्छ, सुस्थित आणि आधुनिक स्वरूपात विकसित करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी व्यापारी आणि नागरिकांना दिली.

पावसाळ्यात साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढून विविध साथीचे आजार पसरण्याची शक्यता असते. त्यामुळे नगरपरिषदेने शहरातील साफसफाई, नाल्यांची स्वच्छता, कचरा संकलन आणि निर्जंतुकीकरणाच्या कामांना विशेष गती दिली आहे. शहरातील विविध भागात स्वच्छता मोहीम राबविण्यासोबतच जनजागृती फलकांच्या माध्यमातून नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले जात आहे.



- **साथीचे आजार पसरण्याची शक्यता**
- **परिसर स्वच्छतेकडे विशेष लक्ष**

नगरपरिषदेच्या वतीने नागरिकांना आपल्या घराचा व परिसराचा स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याचे, कचरा फक्त निर्धारित ठिकाणी टाकण्याचे तसेच साचलेले पाणी त्वरित हटविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्वच्छतेची सवय अंगीकारल्यास अनेक संसर्गजन्य आजारांपासून बचाव होऊ शकतो, असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

स्वच्छ शहर, निरोगी शहर हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून नगरपरिषद युद्धपातळीवर काम करत आहे. या मोहिमेला यशस्वी करण्यासाठी प्रत्येक नागरिक, व्यापारी आणि सामाजिक संस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नगराध्यक्षांनी केले आहे. या मोहिमेत समीर मसूरकर, अविनाश किरवे, कैलास गायकवाड, मुकादम विनोद सोळंकी यांच्यासह भाजी मार्केटमधील व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### चाकरमान्यांसाठी श्रीवर्धन आगार सज्ज

**श्रीवर्धन** : गोपाळकाला, हरितालिका आणि गणेशोत्सव हे श्रीवर्धन तालुक्यातील चाकरमान्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचे उत्सव आहेत. मुंबई शहर व उपनगरात कामानिमित्त असणारे नागरिक या उत्सवांसाठी गावी आवर्जून येतात. या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी श्रीवर्धन आगाराकडून विशेष एसटी बसेसचे नियोजन करण्यात येणार आहे.



चाकरमान्यांच्या सोयीनुसार बसेसच्या वेळा आणि सुटण्याचे ठिकाण ठरवले जाणार आहे. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी खालील क्रमांकांवर संपर्क साधावा आगार प्रमुख.:- +९१ ८४२१५५१३७९, स्थानक प्रमुख.:- +९१ ८४५४८७६१५६, श्रीवर्धन बसस्थानक.:- ०२१४७-२२२२४१ गणेशोत्सवात गावी येणाऱ्या प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी श्रीवर्धन आगाराकडून हे सहकार्याचे पाऊल उचलले असून, चाकरमान्यांनी या सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन आगारप्रमुख महिबूब मणेर यांनी केले आहे.

### श्रीवर्धन पोलिसांकडून डायल ११२ चे मार्गदर्शन



**श्रीवर्धनी** : नागरिकांना आपत्कालीन प्रसंगी एकाच क्रमांकावर तात्काळ मदत उपलब्ध व्हावी, यासाठी राज्य शासनाच्या डायल ११२ या एकात्मिक सेवेबाबत श्रीवर्धन पोलीस ठाण्याच्या वतीने मंगळवारी (दि.४) ऑगस्ट रोजी शहरात धडक जनजागृती अभियान राबविण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत पोलीस प्रशासन, अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका सेवा मिळवण्यासाठी नागरिकांना आता वेगवेगळ्या नंबरवर संपर्क साधण्याची गरज नाही. डायल ११२ वर कॉल करताच या तिन्ही सेवा तात्काळ उपलब्ध होतात. या उपक्रमाचा मुख्य उद्देश श्रीवर्धनकर आणि येथे येणाऱ्या पर्यटकांपर्यंत पोहोचवणे हा होता. या अभियानाअंतर्गत शहरातील मच्छी मार्केट, समुद्रकिनारा, बसस्थानक परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे नागरिक, व्यापारी, वाहनचालक व पर्यटकांशी प्रत्यक्ष संवाद साधला. या जनजागृती मोहिमेत धम्मपाल कयापक, अनिल हिवाळे, प्रतीक्षा क्षीरसागर, सुरज शिंदे, ईश्वर खरात, जितेश पाटील यांनी सहभाग घेतला. डायल ११२ सेवा कशी कार्य करते, तिचा योग्य आणि जबाबदारीने वापर कसा करावा, तसेच ऐनवेळी कशी मदत मिळवावी, याचे सविस्तर प्रात्यक्षिक व मार्गदर्शन पोलिसांनी नागरिकांना दिले.

### गांजा सेवन करणाऱ्यांवर कारवाई

**पनवेल** : पनवेल शहर पोलिसांनी रेल्वे स्थानकाबाहेरील सर्कल परिसरात गांजा सेवन करणाऱ्या एका तरुणावर कारवाई केली असून त्याच्याविरुद्ध अमली पदार्थ विरोधी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हर्षद जाधव, रा. मालधक्का रोड, रेल्वे स्थानकाबाहेरील सर्कल परिसरात गांजाचे सेवन करताना रंगेहाथ पकडण्यात आले. आरोपीकडे गांजाची पाने व फुले असलेला अमली पदार्थ आढळून आला. तो चिलममध्ये भरून त्याचे सेवन करत असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले.या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# झेनिथ ठाकूरवाडीत सुरक्षा साहित्य वाटप



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली परिसरातील झेनिथ वॉटरफॉल, केपी वॉटरफॉल तसेच इतर नैसर्गिक धबधबे पावसाळ्यात हजारो पर्यटकांचे प्रमुख आकर्षण ठरत असून, पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आता स्थानिक युवकांची प्रशिक्षित रेस्क्यू टीम उभारण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. हेल्प फाउंडेशनच्या पुढाकारातून विहारी-झेनिथ ठाकूरवाडीतील युवकांना रेस्क्यूसाठी आवश्यक प्राथमिक सुरक्षा साहित्याचे वितरण करण्यात आले.

पावसाळ्यात खोपोली परिसरातील पर्यटक मोठ्या संख्येने धबधब्यांवर येतात. मात्र, सोशल मीडियासाठी रील्स, व्हिडिओ काढण्याच्या नादात अनेक पर्यटक धोकादायक ठिकाणी जात असल्याने दरवर्षी अपघातात वाढ होत आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर प्रशिक्षित बचाव पथकाची गरज जाणवत होती. याप्रसंगी सुनील पुरी, सौरभ घरत, योगेश औटी, निखिल ढोले, नारायण निरगुडे, कुमार ढुमने, प्रकाश निरगुडे, राकेश भगत, अक्षय जाधव, सचिन भगत आदी उपस्थित होते.

# जे. एस. एममध्ये आपत्ती व्यवस्थापन शिबीर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जे. एस. एम. महाविद्यालय, अलिबाग येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ५ बटालियन एन. डी. आर. एफ. पथक, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. याप्रसंगी एनडीआरएफचे सुशांतकुमार सेठी, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. निळकंठ शेरे, उपप्राचार्य व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकवाड, कार्यक्रम अधिकारी डॉ. पंकज घरत तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे १६७ स्वयंसेवक उपस्थित होते. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. गौतम पाटील आणि प्राचार्या डॉ. सोनाली पाटील यांनी शिबिरासाठी शुभेच्छा देत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ होते, असे मत व्यक्त केले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रविण गायकवाड यांनी करत शिबिराचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण आत्मसात करून संकटकाळात मदतकार्य करण्यासाठी सज्ज राहावे, असे आवाहन त्यांनी केले. प्रशिक्षक सेठी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी नैसर्गिक आपत्तींचे स्वरूप, आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची खबरदारी, प्रथमोपचाराची मूलभूत तत्त्वे तसेच बचावकार्याच्या विविध पद्धती याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी बचावकार्याची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेत विविध बचाव तंत्रांचा अनुभव घेतला. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाविषयी जागरूकता निर्माण होऊन संकटकाळात धैर्याने कार्य करण्याचा आत्मविश्वास वाढल्याची भावना अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पंकज घरत यांनी केले.

# गॅस सिलिंडरचा निष्काळजी वापर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वडघर परिसरात सार्वजनिक ठिकाणी गॅस सिलिंडरचा निष्काळजी व धोकादायक पद्धतीने वापर करून मानवी जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी एका चिकन फ्राय विक्रेत्याविरुद्ध पनवेल शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इरफान खान हारून खान (वय ३२) हा वडघर येथील कॉलेज फाटा-करंजाडे रोड परिसरात गॅस सिलिंडरच्या साहाय्याने चिकन फ्राय विक्रीचा व्यवसाय करत असताना सार्वजनिक सुरक्षिततेला धोका निर्माण होईल अशा प्रकारे व्यवसाय करत असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ करीत आहेत.

# ‘ताम्हिणी घाट मार्गाची भूमिका स्पष्ट करा’

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव बाजूकडून पुणे बाजूकडे जाण्यासाठी व पुणे बाजूकडून माणगावकडे येण्यासाठी प्रशासनाने ताम्हिणी घाट मार्गाची भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी माणगाव येथील प्रवासी तथा प्रसिद्ध डॉ. हेमंत गांधी यांनी प्रसार माध्यमांजवळ संवाद साधताना केली आहे.

प्रशासन या मार्गाबाबत वरवर भूमिका बदलत असल्याने प्रवाशानी संतप्त भावना व्यक्त केल्या आहेत. सध्या पावसाचे दिवस सुरु असून या काळात घाट मार्गावर दरडी कोसळणे, रस्ता खचणे अशा गोष्टी सातत्याने घडत असतात. त्यामुळे प्रशासन ठराविक कालावधीसाठी हे घाट मार्ग बंद ठेवीत असतात. अशाच घाट मार्गांपैकी ताम्हिणी घाट मार्ग हा एक आहे. हा घाट मार्ग माणगाव बाजूकडून पुणे बाजूकडे जाण्यासाठी व पुणे बाजूकडून माणगावकडे येण्यासाठी प्रवाशांना सोईस्कर ठरत असतो. या घाट मार्गावरून दिवसातून हजारो वाहने ये-जा करीत असतात. त्यातच शनिवार व रविवार यादिवशी तसेच सुट्टीच्या काळात पुण्याहून माणगाव जवळील श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगर, बाणकोट, आदी ठिकाणी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची मोठी संख्या असते. त्याचबरोबर कोणी आजारी असल्यास माणगाव भागातील रुग्णांना पाली-खोपोलीमार्गे नेण्यापेक्षा ताम्हिणी घाट मार्ग जवळचा पडतो. त्यामुळे या भागातील लोक याच मार्गाचा जास्त उपयोग करतात. परंतु, सुरु असलेल्या या पावसाळ्याच्या मोसमात प्रशासन या घाट मार्गाबाबत भूमिका स्पष्ट करत नसल्याने प्रवासी व नागरिकांमध्ये या मार्गाबाबत दररोज संभ्रम निर्माण होत असून अनेकांनी याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला आहे. काही दिवसांपूर्वी याच घाट मार्गावरून लहान गाडयांना सोडले जात होते. प्रशासनाने आता सर्वच गाड्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश असल्याचे सांगत हा मार्ग बंद केला आहे. या मार्गावरून काहीवेळा लहान वाहने सोडली जात आहेत. पुन्हा दोन दिवसांनी या वाहनांवर बंदी आणली जात आहे. यामुळे वाहन चालक, प्रवासी हे सारेजण संभ्रमात आहेत. या मार्गाबाबत प्रशासनाने योग्य ती भूमिका स्पष्ट करणे गरजेचे आहे. अनेक वाहनचालक या मार्गावरून येतात व अर्ध्यात आल्यावर हा मार्ग बंद आहे पुढे जाऊ नका असे सांगून वाहन चालकांना रोखण्यात येते. त्यामुळे अनेकांचा वेळ व पैसा वाया जात आहे. यासाठी प्रशासनाने पावसाळ्यात या दिवसांपर्यंत हा मार्ग सर्व वाहनांसाठी पूर्णपणे बंद राहील अशी ठोस भूमिका स्पष्ट करावी त्यामुळे वाहन चालक या मार्गावरून जाणार नाहीत असे संतप्त नागरिकांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगितले.




# विमानतळाच्या प्रवेशमार्गाची दुरवस्था

**। उरण । प्रतिनिधी ।**

शहरांतून जाणारे सर्वच महामार्ग खड्डेग्रस्त झाले आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू झाली असताना या विमानतळाकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्यांचीही अवस्था दयनीय आहे. विमानतळाचा प्रवेशमार्ग असलेल्या उलवे-बेलापूर मार्गासह शीव-पनवेल महामार्ग आणि ठाणे-बेलापूर मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. जेएनपीए बंदर, औद्योगिक पट्टा आणि विमानतळाला जोडणाऱ्या महत्त्वाच्या मार्गांवरील दुरवस्था आता केवळ वाहतुकीचा प्रश्न न राहता सुरक्षिततेचाही गंभीर विषय बनली आहे. नवी मुंबईतील प्रमुख महामार्गांवर दररोज लाखो वाहनांची ये-जा होते. विमानतळावर जाणारे प्रवासी, कंटेनर वाहतूक, खासगी बस, सार्वजनिक वाहतूक तसेच दुचाकीस्वारांचा समावेश आहे. मात्र, पावसाळा सुरू होताच या महामार्गांवर मोठमोठे खड्डे पडल्याने प्रवास अधिकच धोकादायक बनला आहे.

# शाळकरी मुलांना भात लागवडीचे धडे



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

मोबाईलमध्ये रमणारी पिढीला भात लागवडीची माहिती उपलब्ध व्हावी, यासाठी शाळकरी मुलांना लागवडीचे धडे देण्यात आले. अलिबाग तालुक्यातील वढाव येथील राजिप शाळेच्या पुढाकाराने हा उपक्रम हाती घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यानी शेतांमध्ये उतरून भात रोपे काढणीपासून भात रोपांच्या लागवडीची कामे शिकण्याचा आनंद लुटला.

जिल्ह्यामध्ये सध्या भात लावणीची कामे सुरु झाली आहे. ठिकठिकाणी लावणीची कामे केली जात आहे. जिल्हा परिषदेतील शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच इतर ज्ञान मिळावे,यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. एक दिवस दप्तराविना शाळेपासून अनेक उपक्रम राबविण्यात आले आहेत. त्याचा एक भाग म्हणजे अलिबाग तालुक्यातील वढाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना भात लावणीचे धडे देण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांना शेतावर उतरविण्यात आले. त्यांना भात लागवडीपासूनचे महत्व पटवून देण्यात आले. त्यानंतर मुलांनी भाताची रोपे काढणीपासून रोपांची लागवड करण्यापर्यंतच्या अनेक कामांचे धडे शेतकऱ्यांकडून घेतला. वढाव शाळेच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा विद्यार्थ्यांनी मनमुरादपणे आनंद लुटला.

**वाहन चालकांसह पादचारांवर हल्ल्याची भिती** | **ठोस उपाय करण्यास यंत्रणा अपयशी**

# भटक्या कुत्र्यांचा धोका

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये भटक्या कुत्र्यांचा वावर प्रचंड वाढला आहे. एकत्रित येऊन हल्ला करण्याची भिती निर्माण झाली आहे. रस्त्यावर गटा गटाने असलेल्या या मोकाट कुत्र्यांमुळे पादचाऱ्यांसह दुचाकी चालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. अलिबाग-रोहा मार्गावर कुत्र्यांची दहशत वाढली आहे. मात्र, त्यावर ठोस उपाय करण्यास यंत्रणा अपयशी ठरत आहे.



जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात ठिकठिकाणी कुत्र्यांचा झुंड दिसून येतो. अनेक वेळा हे कुत्रे माणसांवर एकत्रीत हल्ले करीत असतात. काही वेळा दुचाकीवरून प्रवास करीत असताना कुत्रे अंगावर आल्याने अपघात होण्याची भितीदेखील असते. गावे, वाड्यांमध्ये कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, स्थानिक प्रशासनाकडून त्यांच्यावर ठोस कारवाई केली जात नसल्याने नागरिकांना विशेष करून लहान मुलांना दहशतीच्या खाली राहवे लागत आहे. जानेवारी २०२२ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत सात हजार २५५ जणांवर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केला. एक हजार २०४ जणांना उपचारासाठी दाखल केले आहेत. दोन हजार ९७२ जणांवर बाह्य रुग्ण कक्षात उपचार केल्याची माहिती जिल्हा रुग्णालयाकडून देण्यात आली आहे. ऑक्टोबर २०२५ ते जूलै २०२६ या कालावधीत ७० हून अधिक जणांवर कुत्र्यांनी हल्ला केल्याची माहिती समोर येत आहे. अनेक ठिकाणी कुत्रे एकत्रित येऊन हल्ला करतात. लहान मुलांपासून महिला, ज्येष्ठ नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण झाला आहे. दुचाकीवर हल्ला होत असल्याने अपघाताचे संकट निर्माण झाले आहे.

**पशुसंवर्धन विभागाचा प्रयोग फसला**

मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाने २०२४ मध्ये पुढाकार घेतला होता. ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येनुसार कुत्र्यांचे निर्बिजीकरण, शस्त्रक्रिया व श्वान दंश प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले होते. त्यासाठी सुरुवातीला अलिबाग तालुक्यातील चेंढरे, चौल व थळ, ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली होती.

# पोखरकर वाडी तीन दिवसापासून अंधारात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कशेळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या पोखरकरवाडी या गावातील वीज पुरवठा खंडित झाला आहे. वीज रोहित्र जळाले असल्याने ५६ घरांची वस्ती असलेले हे गाव तीन दिवसापासून अंधारात आहे. दरम्यान या अन्यायाविरुद्ध ग्रामस्थ कशेळे येथील महावितरण कार्यालयात मोर्चा घेऊन गेले असून गेली तीन दिवस ग्रामस्थ महावितरण कार्यालयात जात आहेत.

कशेळे जवळील पोखरकरवाडी हे गाव असून या गावाची लोकसंख्या साधारण ३०० आहे. ५६ घरांच्या या गावाला वीज पुरवठा करणारे वीज रोहित्र एक ऑगस्ट रोजी बिघडले आणि गावचा वीज पुरवठा खंडित झाला. त्यानंतर कर्जत महावितरण उप विभाग कक्षेत असलेले कशेळे शाखा अभियंता यांच्या कार्यालयातून कर्मचारी पोखरकरवाडी येथे पोहचले.पण तेथील १०० केव्हीए क्षमतेचे वीज रोहित्र बिघडले असल्याने वीज पुरवठा पूर्ववत झाला नाही. त्यामुळे सलग दुसऱ्या दिवशी पोखरकरवाडीमध्ये वीज पुरवठा खंडित होता. त्यामुळे ग्रामस्थांनी संताप व्यक्त करत कारभाराचा निषेध केला.



याप्रसंगी किशोर पोखरकर, गजानन आवारी, रोहिदास ताम्हाणे, धनंजय पोखरकर, नितेश ताम्हाणे, रोशन बनगर, प्रसाद चौधरी, अनिल यादव, भरत आवारी, समीर चौधरी आदी उपस्थित होते.

# मौनाची भाषांतरे

राजकीय नेते एरवी सतत दणादण बोलत असतात. पण काही वेळेला ते मौनात जातात. जसे नरेंद्र मोदी दुनियाभरच्या सगळ्या गोष्टींवर बोलतील. पण राममंदिराच्या पैशावर त्यांच्याच मंडळींनी दरोडा घातला त्यावर बोलणार नाहीत. किंवा जंतरमंतरवर पोरे आंदोलनाला बसली तरी ते महिनाभर गप्प राहतील. हे सोईस्कर मौन बाजूला ठेवू. त्याचा अर्थ सर्वांना कळतो. पण काही नेते अजिबातच बोलत नाहीत. विशेषतः राजकारण्यांच्या पत्नी, बहीण किंवा कुटुंबातील महिला. एकाएकी काही प्रसंगाने त्यांना राजकारणात यावे लागलेले असते. इथल्या धांगडधिंग्याची आणि धबडग्याची त्यांना सवय नसते. इथले छक्केपंजे समजून घेण्याचा त्या प्रयत्न करीत असतात. अशा वेळी त्या सुरुवातीला तरी बराच काळ गप्प राहून निरीक्षण करतात. पण हा गप्प राहण्याचा काळ फार लांबवून चालत नाही. नाहीतर मग तर्कवितर्क सुरू होतात. जसे आता सुनेत्रा पवार यांच्या बाबत चालू आहेत. सुनेत्रा पवार यांना काँग्रेसने गूंगी गुडिया म्हटल्याने वाद निर्माण झाला आहे. कहर म्हणजे वाद वाढल्यानंतर गूंगी गुडिया ही काही शिवी नाही किंवा असंसदीय शब्द नाही असा खुलासा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी केला आहे. त्यांनी सुनेत्रा यांना दुर्गा बनण्याचा सल्ला दिला आहे. हा सगळाच एक गंमतीचाच प्रकार म्हणायला हवा. कारण, मुळात गूंगी गुडिया हा शब्दप्रयोग इंदिरा गांधींबाबत केला गेला. त्या काँग्रेससाठी परमवंदनीय. शास्त्रीजींच्या निधनानंतर इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या तरी फार बोलत नव्हत्या. त्यावेळी त्या गूंगी गुडिया आहेत म्हणजे निव्वळ एक बाहुली आहेत आणि खरा कारभार काँग्रेसमधले जुने मातब्बर नेतेच चालवणार आहेत असा एक समज झाला होता. इंदिराजींनी काही दिवसातच तो मोडून काढला. हरित क्रांती, बँकांचे राष्ट्रीयकरण झाले. या मुद्द्यांवर काँग्रेस फुटली तरी पर्वा केली नाही. सगळ्यात कहर म्हणजे दोनच वर्षांनी त्यांनी बांगलादेशचे युध्द केले आणि पाकिस्तानचेही दोन तुकडे केले. त्यावेळी अटलबिहारी वाजपेयी यांनी इंदिरा यांचे वर्णन दुर्गा असे केले होते.

## दादांच्या जाण्यानंतर

काँग्रेसने सुनेत्रा यांच्याकडून या सर्व अपेक्षा केलेल्या दिसतात. याला मुळात कारण झाला तो एक व्हिडिओ. बीडमध्ये सुनेत्रा यांच्यावर पत्रकारांच्या प्रश्नांचा भडिमार झाल्याने धनंजय मुंडे हे परस्पर पत्रकारांना गप्प करीत आहेत असे या व्हिडियोत दिसते आहे. हा प्रसंग खरा असो किंवा वेगळ्या रीतीने घडलेला असो, सुनेत्रा पवार या म्हणाव्या त्या पध्दतीने सक्रीय झालेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अनेक जुने व अनुभवी नेते असले तरी पक्षाचा मुख्य आधारस्तंभ दादाच होते. त्यांच्या अचानक निधनाने हा खांब कोसळला. त्याला आता सहा महिने लोटले आहेत. मधल्या काळात सुनेत्रा या उपमुख्यमंत्री व पक्षाच्या राष्ट्रीय प्रमुख झालेल्या आहेत. पण पक्षसंघटना किंवा राज्यकारभार यामध्ये त्यांनी कोणतीही विशेष कामगिरी केलेली नाही. त्यांची एकही घोषणा वा भाषण हे लक्षात राहण्यासारखे झालेले नाही. दादांकडे अर्थ खाते होते. ते देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याकडे ठेवले आहे. सुनेत्रा यांच्याकडे कारभाराचा अनुभव नसल्याने त्यांना हे खाते देणे कठीण आहे हे समजण्यासारखे आहे. पण त्यांच्या पक्षाकडे हे खाते सांभाळू शकतील असे लोक आहेत. त्यांच्यासाठी या पदाचा आग्रह सुनेत्रा यांना धरता आलेला नाही. याचे कारण त्यांना आपली व आपल्या पक्षाची ताकद नव्याने सिध्द करता आलेली नाही. त्यासाठीची धडाडी दाखवता आलेली नाही. उलट हा पक्ष अंतर्गत राजकारणात गटांगळ्या खातो आहे. प्रफुल्ल पटेल आणि इतर काही नेत्यांचे हेतू संशयास्पद होते. म्हणून तर निवडणूक आयोगाकडे पक्षाची माहिती पाठवताना यांची पदे वगळली गेली. नंतर अनवधान वगैरे न पटणाऱ्या सबबी दिल्या गेल्या. दादांच्या मृत्यूनंतर कोणत्याही इतर पदावरून केला गेलेला पत्रव्यवहार ग्राह्य मानू नये असे सांगण्याची वेळ आली. सुनेत्रा यांनी पटेल व इतर कथित चांडाळचौकडीला गप्प केले असेल. पण यामध्ये त्यांच्या सोबत केवल जय पवार होते असे दिसले. इतर कोणावर त्यांचा भरवसा नसावा किंवा त्यांची मदत होईल की नाही याविषयी त्यांना शंका असावी. ते काहीही असले तरी यामुळे हा पक्ष म्हणजे सुनेत्रा आणि जय यांची खासगी कंपनी असल्यासारखे चित्र निर्माण झाले.


## धडाडी दाखवावी लागेल

इतके करूनही पक्षाचे अस्तित्व ठळक झालेले नाही. सुनेत्रा यांनी पक्षामध्ये स्वतःची अशी नवी फळी उभारलेली नाही. पक्षाला कोणताही स्वतंत्र कार्यक्रम दिलेला नाही. पक्षाकडे असलेल्या खात्यांमार्फत जनतेवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न झालेला नाही. दादा गेल्याला सहा महिनेच तर झाले आहेत असे स्पष्टीकरण काही जण देण्याचा प्रयत्न करतील. पण आजच्या राजकारणात दोन महिनेही खूप होतात. सुनेत्रा यांना क्षमता सिध्द करण्यासाठी फार वेळ मिळणार नाही. कारण, मुळात त्यांच्या पक्षाची निर्मिती हीच असाधारण स्थितीत झालेली आहे. राज्यातून शरद पवार आणि राष्ट्रवादीचे राजकारण संपवायचे हा भाजपचा दीर्घ काळचा कार्यक्रम आहे. अजितदादांना आपल्यासोबत घेणे हाही, आश्चर्यकारक असला तरी त्याचाच भाग होता. दादा व त्यांचा गट सत्तेशिवाय राहू शकत नाहीत हे दाखवणे आणि क्रमाक्रमाने त्यांची शक्ती कमी करीत नेणे हाच दिल्लीतल्या भाजप नेत्यांचा डाव होता व आहे. दादांचा प्रभाव मोठा होता व ते मुरब्बी असल्याने त्याला प्रतिशह देऊ शकत होते. आपल्या कारभारामधूनही राज्यभर त्यांनी आपल्याला पाठिंबा देणाऱ्यांचे जाळे निर्माण केले होते. त्यांचा म्हणून एक करिश्मा होता. सुनेत्रा, जय किंवा राष्ट्रवादीच्या नेतृत्वाला हा करिश्मा लवकरात लवकर निर्माण करावा लागेल. आज भाजपला सत्ता टिकवण्यासाठी राष्ट्रवादीच काय शिंदे गटाचीही फारशी गरज उरलेली नाही. तरीही ते दोघांना जगवत आहेत. त्यात त्यांची काही गणिते आहेत. शिंदे गटाकडे एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री राहिलेले नेते आहेत. राष्ट्रवादीची फळी मात्र विस्कटलेली आहे. पटेल व इतरांना पक्ष टिकवायचा आहे का अशीच शंका यावी अशी स्थिती आहे. मध्यंतरी कारण नसताना पटेल यांनी जाहीरपणे दादांच्या जाण्याने पोकळी निर्माण झाली असल्याचे वक्तव्य केले होते. विशेष म्हणजे त्याच दिवशी कोण्या एका फालतू नेत्याने सुनेत्रा यांच्या निवडीला आव्हान देणारा एक अर्ज केला होता. हे सगळे राष्ट्रवादीला नगण्य करण्याच्या दिशेने जात आहे. अशा स्थितीत सुनेत्रा यांना मौन टाकून धडाडीने बोलण्या व वागण्याची गरज आहे. भाजपच्या सोबत जाऊनही काही प्रश्नांवर स्पष्टपणे भूमिका घेण्याचे धाडस दादांनी दाखवले होते. जसे की, नबाब मलिक यांच्यावर भाजपवाले टीका करीत असताना पालिका निवडणुकांमध्ये मलिक यांच्यावर मोठी जबाबदारी टाकण्यात आली होती. सुनेत्रा यांना असे धाडस व कसब दाखवता आलेले नाही. ते त्यांना लवकर दाखवावे लागेल.

## विचार

# सागरी पायाभूत सुविधांचा नवा कणा

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जेएनपीटी (जवाहरलाल नेहरू पोर्ट) आणि उभारणी सुरू असलेल्या वाढवण बंदराला समृद्धी महामार्गाशी जोडणारा स्वतंत्र रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉर उभारण्याचा प्रस्ताव मांडला आहे. हा प्रकल्प केवळ वाहतुकीपुरता मर्यादित नसून महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासाला नवी दिशा देणारा ठरू शकतो. पायाभूत सुविधांच्या दृष्टीने विशेष महत्वपूर्ण ठरु शकणाऱ्या या विषयाचा वेध.**




प्रा.सुखदेव बखळे

महाराष्ट्र हा देशाच्या औद्योगिक, आर्थिक आणि व्यापारक्षेत्राचा कणा मानला जातो. उद्योग, सेवा, माहिती-तंत्रज्ञान, कृषी प्रक्रिया, बंदरे आणि दळणवळणाच्या सुविधा यामुळे राज्याने देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. आता या विकासाला आणखी वेग देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वाकांक्षी संकल्पना पुढे आणली आहे. महाराष्ट्रातील 'जेएनपीटी' हे देशातील सर्वात म ोठे कंटेनर बंदर असून भारतातील सुमारे ६० टक्के कंटेनर वाहतूक या बंदरातून केली जाते. याशिवाय पालघर जिल्ह्यात विकसित होणारे वाढवण बंदर हे भविष्यात जगातील दहा सर्वात मोठ्या बंदरांपैकी एक ठरण्याची क्षमता बाळगते. या दोन्ही बंदरांना राज्यातील औद्योगिक पट्टे, ड्राय पोर्ट्स आणि समृद्धी महामार्गाशी रेल्वेद्वारे जोडल्यास निर्यात-आयात प्रक्रिया अधिक वेगवान आणि स्वस्त होईल. आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत कोणत्याही राज्याची किंवा देशाची स्पर्धात्मकता मोठ्या प्रमाणात त्याच्या लॉजिस्टिक व्यवस्थेवर अवलंबून असते. उत्पादन चांगले असले, तरी ते योग्य वेळेत आणि कमी खर्चात बाजारपेठेत पोहोचवता न आल्यास उद्योगांना अपेक्षित नफा मिळत नाही. भारतात लॉजिस्टिक खर्च तुलनेने जास्त असल्याने उद्योगांवर अतिरिक्त आर्थिक भार पडतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पामुळे हा खर्च सुमारे सात ते आठ टक्क्यांपर्यंत आणण्याचे लक्ष्य व्यक्त केले आहे. हे उद्दिष्ट साध्य झाले, तर महाराष्ट्रातील उद्योगांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी स्पर्धात्मक ताकद मिळू शकते.

आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे हा हा रेल्वे कॉरिडॉर समृद्धी महामार्गालगत उभारण्याचा विचार आहे. नागपूर ते मुंबई जोडणाऱ्या या महामार्गासाठी आधीच रेल्वेमार्गासाठी जागा राखीव ठेवण्यात आली आहे. त्यामुळे जमीन संपादनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात टाळता येईल. हा मार्ग जालना आणि वर्धा येथील ड्राय पोर्टसना जोडत गडचिरोलीपर्यंत विस्तारण्याचा विचार आहे. विशेषतः गडचिरोली जिल्हा खनिज संपत्तीने समृद्ध असून भविष्यात स्टील आणि खनिजाधारित उद्योगांचे मोठे केंद्र बनण्याची क्षमता आहे. त्यामुळे या भागातील औद्योगिक विकासाला नवे बळ मिळेल. आजपर्यंत महाराष्ट्राल बंदरांचा लाभ प्रामुख्याने किनारपट्टीवरील आणि काही औद्योगिक भागांपुरताच मर्यादित राहिला आहे. राज्याच्या मोठ्या अंतर्गत भागातील उद्योगांना बंदरांपर्यंत माल पोहोचवण्यासाठी अधिक वेळ आणि खर्च करावा लागतो. नवीन रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉरमुळे राज्यातील सुमारे ७५ टक्के भागाला थेट बंदरांशी जोडले जाईल. त्यामुळे विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील उद्योगांना निर्यातीसाठी मोठी संधी उपलब्ध होईल.

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था देशातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. राज्याचा देशाच्या सकल देशांतर्गत उत्पन्नात सुमारे १४ टक्के वाटा आहे, तर देशाच्या एकूण निर्यातीत जवळपास २० टक्के योगदान महाराष्ट्राचे आहे. ही आकडेवारी राज्याच्या औद्योगिक सामर्थ्याची साक्ष देते. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन, वाहन उद्योग, औषधनिर्मिती, माहिती-तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, वस्त्रोद्योग आणि सेवा क्षेत्रात महाराष्ट्राने उल्लेखनीय प्रगती केली आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन आणि डेटा सेंटर क्षेत्रातही वेगाने पुढे जात आहे. देशातील सुमारे ६० टक्के डेटा सेंटर क्षमता महाराष्ट्रात विकसित होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), 'क्लाऊड कॉम्प्युटिंग', डिजिटल सेवा आणि फिनटेक क्षेत्रातील वाढ लक्षात घेता डेटा सेंटरचे महत्त्व अधिक वाढत आहे. विश्वासार्ह वीजपुरवठा, उत्कृष्ट इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि उद्योगपूरक वातावरण यामुळे महाराष्ट्र या क्षेत्रात आघाडीवर आहे. त्यांनी मुंबई आणि पुणे या दोन शहरांना भारताचे 'क्वांटम व्हॅली' असे संबोधले. 'क्वांटम कॉम्प्युटिंग', कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, संशोधन आणि नवोपक्रम यामध्ये ही दोन्ही शहरे वेगाने विकसित होत आहेत. प्रस्तावित हाय-स्पीड रेल्वे आणि इतर दळणवळण प्रकल्प पूर्ण झाल्यास मुंबई-पुणे हा देशातील सर्वात मोठा तंत्रज्ञान आणि नवोपक्रम आर्थिक कॉरिडॉर ठरू शकतो. या प्रकल्पाचा सर्वाधिक लाभ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) होण्याची शक्यता आहे.

मोठ्या उद्योगांकडे स्वतःची वाहतूक व्यवस्था असते; परंतु लहान उद्योगांना वाहतूक खर्चाचा मोठा फटका बसतो. बंदरांशी थेट रेल्वे संपर्क उपलब्ध झाल्यास त्यांचा खर्च कमी होईल आणि त्यांच्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत स्पर्धा करण्याची संधी मिळेल. शेती आणि कृषी प्रक्रिया उद्योगांनाही या प्रकल्पाचा मोठा फायदा होईल. महाराष्ट्रात द्राक्षे, डाळिंब, संत्री, कांदा, ऊस, कापूस, सोयाबीन आणि इतर अनेक कृषी उत्पादने मोठ्या प्रमाणावर तयार होतात. ही उत्पादने कमी वेळेत बंदरांपर्यंत पोहोचल्यास निर्यात वाढू शकते. विशेषतः नाशवंत कृषी उत्पादनांसाठी जलद वाहतूक अत्यंत महत्त्वाची असते. पर्यावरणाच्या दृष्टीनेही रेल्वे मालवाहतूक अधिक फायदेशीर मानली जाते. रस्ते वाहतुकीच्या तुलनेत रेल्वेमुळे इंधनाचा वापर कमी होतो, कार्बन उत्सर्जन घटते आणि रस्त्यांवरील वाहतुकीचा ताणही कमी होतो. त्यामुळे शाश्वत विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरतो. अर्थात, एवढा मोठा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी अनेक आव्हानेही आहेत. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक, केंद्र आणि राज्य सरकारमधील समन्वय, रेल्वे मंत्रालयाचे सहकार्य, पर्यावरणीय मंजुरी, स्थानिक पायाभूत सुविधा आणि वेळेत प्रकल्प पूर्ण करणे या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. तसेच उद्योग, स्थानिक प्रशासन आणि नागरिक यांच्यात प्रभावी समन्वय राखणेही आवश्यक ठरेल. महाराष्ट्राने यापूर्वी समृद्धी महामार्ग, मेट्रो प्रकल्प, किनारी रस्ते, नवीन विम ानतळ, औद्योगिक कॉरिडॉर आणि विविध लॉजिस्टिक पार्क उभारून पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वाची झेप घेतली आहे. प्रस्तावित रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉर हा त्या विकासाचा पुढचा टप्पा ठरू शकतो.

या प्रकल्पामुळे राज्यातील औद्योगिक विकासाचा केंद्रबिंदू केवळ मुंबई-पुण्यापुरता मर्यादित न राहता विदर्भ, मराठवाडा आणि इतर भागांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. जागतिक स्तरावर उद्योग गुंतवणुकीसाठी स्पर्धा वाढत असताना उत्तम पायाभूत सुविधा, कमी वाहतूक खर्च आणि वेगवान पुरवठा साखळी ही कोणत्याही राज्याची सर्वात मोठी ताकद असते. म हाराष्ट्राने या दिशेने सातत्याने पावले उचलल्यास अधिक परकीय गुंतवणूक आकर्षित होईल, रोजगारनिर्मिती वाढेल आणि राज्याच्या आर्थिक विकासाला नवी गती मिळेल. एकंदरीत, 'जेएनपीटी' आणि वाढवण बंदरांना समृद्धी महामार्गाशी जोडणारा प्रस्तावित रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉर हा केवळ वाहतुकीचा प्रकल्प नाही, तर तो महाराष्ट्राच्या भविष्यातील औद्योगिक, आर्थिक आणि निर्यातक्षम विकासाचा पाया ठरू शकतो. बंदरे, महामार्ग, रेल्वे आणि औद्योगिक क्षेत्र यांची साखळी मजबूत झाली, तर महाराष्ट्र जागतिक पुरवठा साखळीतील एक महत्त्वाचे केंद्र म्हणून अधिक सक्षमपणे उदयास येईल. या प्रकल्पाची यशस्वी अंम लबजावणी झाली, तर 'विकसित महाराष्ट्र' आणि 'विकसित भारत' या संकल्पनांना प्रत्यक्ष बळ मिळेल. भारताच्या आर्थिक विकासाला गती देण्यासाठी आणि जागतिक व्यापारात देशाचे स्थान बळकट करण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. गेल्या काही दशकांमध्ये भारताने रस्ते, रेल्वे आणि बंदरांच्या आधुनिकीकरणावर विशेष भर दिला आहे. याच मालिकेतील एक अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि 'गेम-चेंजर' प्रकल्प म्हणजे जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जेएनपीटी) आणि नियोजित वाढवण बंदर यांना जोडणारा स्वतंत्र रेल्वे मालवाहतूक कॉरिडॉर (डेडिकेटेड फ्रीट कॉरिडॉर).

महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्यावर आकाराला येत असलेला हा रेल्वे कॉरिडॉर केवळ दोन बंदरांना जोडणारा मार्ग नसून भारताच्या आयात-निर्यात क्षेत्राची कार्यक्षमता वाढवणारा, लॉजिस्टिक खर्च कमी करणारा आणि देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापाराला नवी दिशा देणारा एक महामार्ग ठरणार आहे.

**(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

## चर्चा आजची

# काँक्रीट रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत प्रश्न



प्रमोद जाधव

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत अलिबाग तालुक्यासह मुरूड तालुक्यामध्ये रस्ते काँक्रीटीकरणाची कामे सुरु करण्यात आली आहे. रुंदीकरणासह काँक्रीटीकरणातून होणाऱ्या रस्त्यांच्या कामांचा दर्जाबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. मे महिन्यापर्यंत करण्यात आलेल्या अनेक रस्त्यांना खड्डे पडले आहेत. काही रस्त्यांना भेगा तर काही रस्त्यांच्या बाजूला असलेल्या संरक्षक भिंतीची कामे अपूर्ण स्थितीत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये या विभागाच्या कामाबाबत प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अलिबाग व मुरूड तालुक्यातील रस्त्यांचे जाळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित होते.मात्र एमएसआरडीसी अर्थात महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळामार्फत मागील दोन वर्षापासून काँक्रीट रस्त्यांची कामे सुरु झाली. सुरुवातीला साळाव ते तळेखारपर्यंतच्या रस्त्याचे काम करण्यात आले. या रस्त्याच्या दूतर्फा असलेली अनेक झाडे तोडण्यात आली. रस्ता वेळेवर पुर्ण न झाल्याने या मार्गावरील प्रवाशांना चिखलात प्रवास करण्याची वेळ आली होती. सर्वत्र खोदकाम करून ठेवले होते. मात्र रस्त्याच्या कामाला गती नव्हती. मागील वर्षी मे महिन्यात पावसाने सुरुवात केल्याने हा रस्ता चिखलमय झाला होता. या चिखलात दुचाकी काढताना तारेवरची कसरत करावी लागली. या रस्त्याचे आजही अपूर्ण स्थितीत आहे.चोरढेपासून तळेखारपर्यंत अनेक ठिकाणी खोदकाम करून ठेवले. त्याचा परिणाम दुचाकीवाहनांवर झाला. अनेक वेळा चोरढे परिसरात रस्त्याच्या अपूर्ण कामांमुळे अपघात झाले आहेत. मागील मे महिन्यात रात्रीच्या वेळी तिघेजण गंभीर जखमी झाले होते.

अलिबाग ते सहाणबाय मार्गावरील रस्त्याचे काम काही महिन्यापुर्वी सुरु करण्यात आले. या रस्त्याचे काम अपूर्णस्थितीत असल्याचा फटका प्रवाशांना कायमच बसत आहे. काही ठिकाणी खड्डे पडले आहेत. काही ठिकाणी रस्त्याला भेगा पडल्या आहेत. तर काही ठिकाणी साकव उभारूनही रस्त्याच्या दुतर्फा संरक्षण भिंत बांधण्याचा अभाव निर्माण झाला आहे. अलिबाग - रेवस मार्गावरील कार्लेखिंड पासून ठिकठिकाणी रस्त्याचे काम अपुर्ण स्थितीत आहे. या अपुर्ण कामांमुळे अनेक दुचाकी वाहनांचा अपघात झाला. खोदकाम करून ठेवल्याने माती रस्त्यावर पसरली आहे. त्यामुळे पावसाळ्यात मातीतून वाहने घसरण्याचा धोका वाढला आहे. काही ठिकाणी रस्ते तयार झाली असताना सुरक्षेच्या दृष्टीने पांढरे पट्टे बसविण्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे या काँक्रीट रस्त्यावरून प्रवास करताना अपघात होण्याची भिती निर्माण झाली आहे. अलिबाग ते कुरुळ मार्गावरील आरसीएफ कॉलनीजवळील रस्त्याचे काम अपुर्ण स्थितीत आहे. त्यामुळे अनेक वाहने यावरून आदळण्याचा धोका वाढला आहे. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून रस्त्याचे जाळे पसरविण्याचा प्रयत्न होत असताना रस्त्यांच्या कामांची गती आणि दर्जाबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. या रस्त्यांसाठी करोडो रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. त्यासाठी आरएमसी प्लांटही उभारण्यात आला आहे. काँक्रीट रस्त्यासाठी लागणारे सिमेंटचा माल तयार करण्याचे कारखाने जवळ असतानाही या मालाच्या मिश्रणाबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. अलिबाग तालुक्यातील संगमकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या ठिकाणीदेखील खोदकाम करून ठेवले आहेत. त्यामुळे रात्रीच्यावेळी या खड्ड्यांमुळे अपघात होण्याची भिती निर्माण झाली आहे. या रस्त्यांच्या कामांची गती कुर्म गतीने आहे. त्याचा परिणाम परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होत आहे.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा महामंडळामार्फत कुरुळ येथे काँक्रीट रस्त्याचे काम अपूर्ण राहिले. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांच्या अपघाताचा धोका वाढला होता. रस्त्याच्या अपूर्ण कामाचा फटका प्रवाशांना विशेष करून वाहन चालकांना बसला होता. एमएसआयडीसी विभागामार्फत अलिबाग - सहाण बायपास रस्त्याचे काम सुरू आहे. करोडो रुपयांचे असलेले काम कुरुळ स्थानकाजवळ अपूर्ण स्थितीत होते. कुरुळजवळ खड्ड्यातून वाहन चालवावे लागत होते. अनेकवेळा चार चाकी वाहनांसह दुचाकींना त्या खड्ड्याचा दणका बसला होता. यातून मार्ग काढताना अनेकवेळा अपघाताला सामोरे जावे लागले होते. कुरुळमधील अपूर्ण कामामुळे नागरिकांची गैरसोय झाली असून वाहनांचेदेखील नुकसान होण्याची भिती निर्माण झाली होती. सिमेंट काँक्रीटच्या उंच रस्त्यावरून डांबरीवर उतरताना वाहने जोरदार आदळली जात होती. त्यामुळे वाहनांचा अपघात होण्याची शक्यता होती.ही कामे तात्काळ पुर्ण करण्यात यावी अशी मागणी कुरुळचे शेकाप युवा नेते अवधुत पाटील यांनी केली होती. त्यानंतर संबंधित यंत्रणा जागी झाली. त्यांनी अपूर्ण राहिलेल्या रस्त्यांचे काम पुर्ण केले. मुरूड तालुक्यातही काँक्रीट रस्त्याचे काम सुरू आहे. या ठिकाणी खोदकाम करून ठेवल्याने मुरूडकडे जाणाऱ्या प्रवाशांना व चालकांसह पादचाऱ्यांना प्रचंड त्रास होत आहे.

## लोकसंसद

### स्थलांतरितांचा विळखा स्थानिकांच्या मुळावर!

सध्या जागतिक पातळीवर मोरोक्को आणि स्पेन यांच्या सीमेवरील स्थलांतरितांचा संघर्ष आंतरराष्ट्रीय चर्चेचा विषय बनला आहे. काही दिवसांपूर्वी (३० जुलै) ६०,००० हून अधिक मोरोक्को स्थलांतरितांनी एकाच वेळी समुद्रातून पोहत आणि कुंपण तोडून स्पेनच्या सेउटा या शहरात बेकायदेशीरपणे प्रवेश केला. स्थलांतरितांच्या या अभूतपूर्व घुसखोरीमुळे स्पेनची सुरक्षा यंत्रणा पूर्णतः कोलमडली. विशेष म्हणजे या घुसखोरी दरम्यान १०० हून अधिक स्थलांतरितांचा मृत्यू झाला. रोजगाराचा अभाव, आर्थिक विषमता आणि गरिबी तसेच युरोपमधील आर्थिक संपन्नता इत्यादी कारणांमुळे मोरोक्कोचे लोक स्पेनकडे धाव घेत आहेत. भारतात देखील शेजारील देशांमधून, विशेषतः बांगलादेश आणि म्यानमारमधून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर स्थलांतर होते. मोरोक्को-स्पेन सीमेप्रमाणेच भारताच्या पूर्व सीमेवरही घुसखोरीच्या घटना सतत घडत असतात. भारताच्या सीमेवरील काटेरी कुंपणे ओलांडताना आणि सुरक्षा दलांशी होणाऱ्या संघर्षात अनेक घुसखोरांचा आणि मानवी तस्करांच्या जाळ्यात फसलेल्या निरपराध लोकांचा जीव जातो. या अनियंत्रित स्थलांतरामुळे भारताच्या ईशान्येकडील आसाम, त्रिपुरा या राज्यांमध्ये स्थानिक लोकसंख्या, संस्कृती, स्थानिकांच्या हक्काच्या नोकऱ्या, संसाधने आणि जमिनींवर ताण पडत आहे. त्यामुळे सामाजिक असंतोष आणि सुरक्षेचे गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. आपल्या देशात होणारी ही बेकायदेशीर घुसखोरी रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय सीमेवरील सुरक्षा अधिक अत्याधुनिक आणि कडक करणे आवश्यक आहे. **-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# मानवाच्या इतिहासातील काळा दिवस

६ ऑगस्ट १९४५ हा मानवाच्या इतिहासातील अतिशय काळा दिवस. कारण याच दिवशी ६ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने हिरोशिमा शहरावर लिटल बॉय नावाचा अणुबॉम्ब टाकला होता. या हल्ल्यात १ लाख ४० हजार नागरिकांनी जीव गमावला होता, तर ९ ऑगस्ट १९४५ रोजी बॉक्सकार नावाच्या बी.२९ विमानाने फॅट मॅन नावाचा अणूबॉम्ब नागासाकी शहरावर टाकला होता. या हल्ल्यात नागासाकीमधल्या ८० हजारांहून अधिक लोकांनी आपले प्राण गमावले. यामध्ये वाचलेल्यांसाठी मानसिक ताण आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या आरोग्य समस्या, जसे की कर्करोगाचे वाढलेले प्रमाण आणि जन्मजात व्यंग यांचा समावेश होता. हिरोशिमा हे अणुयुद्धातील भीषण अत्याचारांचे प्रतीक बनले.

या दिवशी जगभरात हिरोशिमा दिन साजरा केला जातो. लोक अनेकदा हिरोशिमा दिनाचा अर्थ, इतिहास आणि हा दिवस का पाळला जातो, याबद्दल शोध घेतात. सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, ऐतिहासिक स्मृती जतन करणे, मरण पावलेल्या किंवा ज्यांनी दु:ख सोसले त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करणे आणि भावी पिढ्यांना शांततेचे महत्त्व पटवून देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. ज्यामध्ये अणुनि:शस्त्रीकरण आणि शांततेला चालना देण्याच्या उद्देशाने अनेक उपक्रम आयोजित केले जातात. ६ ऑगस्टच्या सकाळी हिरोशिमावर टाकलेला बॉम्ब हा 'एनोला गे' बी-२९ बॉम्बरने 'लिटल बॉय' युरेनियम गन टाईप ॲटोमिक बॉम्ब होता. त्याचा स्फोट हिरोशिमा शहराच्या २००० फूट उंचावर झाला. त्यात शहराचा पाच चौ. मैल एवढा भाग नष्ट पावला. या दोन्ही शहरांत मरण पावलेल्या लोकांतील निम्मे लोक हे बॉम्ब टाकलेल्या दिवशीच मरण पावले. त्यानंतरच्या महिन्यात अनेक जण भाजलेल्या जखमांमुळे, उत्सर्जित किरणाच्या आजारामुळे, अन्य जखमा, अपुरा आहार आणि आजार यामुळे मृत्यू पावले.

बॉम्बस्फोटामुळे झालेल्या विध्वंसानंतरही जपानने शरणागती पत्करली नाही. ९ ऑगस्ट रोजी अमेरिकेने कोकुरा शहराच्या प्राथमिक लक्ष्यासाठी आणखी एक बी-२९, बॉक्सकार पाठवले. कोकुरावर असलेल्या दाट ढगांनी पायलट मेजर चार्ल्स स्वीनी यांना बॉम्ब टाकण्यापासून रोखले. म्हणून दुसरा निशाणा डोंगरांमध्ये वसलेल्या नागासाकीवर बसला. त्याने सकाळी ११.०२ वाजता 'फॅट मॅन' टाकला. हा प्लूटोनियम बॉम्ब हिरोशिमामध्ये वापरलेल्या बॉम्बपेक्षा अधिक शक्तिशाली होता. त्यातून २२ किलोटनचा स्फोट झाला. नागासाकी बॉम्बस्फोटानंतर सहा दिवसांनी १५ ऑगस्ट रोजी सम्राट हिरोहितोने जपानच्या आत्मसमर्पणाची घोषणा एका रेडिओ प्रसारणात केली. २ सप्टेंबर रोजी टोक्यो खाडीवर अँकर केलेल्या अमेरिकन युद्धनौका मिसौरीवर शरण येण्याचा औपचारिक करार झाला. कारण दोन शहरातील बहुतांश पायाभूत सुविधा पुसून टाकल्या गेल्या होत्या. दोन बॉम्बस्फोटांमुळे झालेल्या मृत्यूंची वास्तविक संख्या कधीच कळू शकली नाही.

हिरोशिमा, नागासाकी या शहरांवरील हल्ल्यानंतरही जगात दोन हजारांहून अधिक आण्विक शस्त्रांच्या चाचण्या झाल्या. १९४५ ते १९८० या काळात जगातील ५०० हून अधिक ठिकाणी वातावरणातील आण्विक शस्त्रांच्या चाचण्या घेण्यात आल्या. त्यात अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स, चीन, भारत, पाकिस्तान आणि उत्तर कोरिया या देशांचा समावेश आहे. या देशांनी आण्विक शस्त्रांच्या चाचण्या घेतल्या आणि त्याची कबुलीही दिली. हिरोशिमा आणि जगभरातील स्मरणोत्सव केवळ ऐतिहासिक स्मरणापुरते मर्यादित राहिले नाहीत. ते व्यापक शांतता प्रयत्न, युद्धविरोधी चिंतन आणि अणुनि:शस्त्रीकरणावरील चर्चेचाही भाग बनले. म्हणूनच १९४५ नंतर अनेक दशकांनीही हिरोशिमा दिनाचे महत्त्व कायम आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ ऑगस्ट

१) श्री.विश्वास नामदेव म्हात्रे, अलिबाग, ६-८-१९३८

२) श्रीम.विजया दामोदर ठोसर नागाव-अलिबाग, ६-८-१९४६

३)श्रीम. प्रभावती घनश्याम पेरेकर अलिबाग ६-८-१९५३

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८**
**(बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# मनसेच्या पाठपुराव्याला यश

## ● नाते खिंडीतील रखडलेले रस्त्याचे काम अखेर सुरू

**। महाड । प्रतिनिधी ।**



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून किल्ले रायगडकडे जाणाऱ्या मुख्यद्वार समजले जाणारे रायगड रोडवरील नाते खिंडीतील अनेक दिवसांपासून रखडलेले रस्त्याच्या दुरुस्तीचे काम बुधवार (दि.५) पासून सुरू करण्यात आले आहे. या कामाला सुरवात झाल्याने परिसरातील नागरिक, वाहनचालक आणि प्रवाशांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

नाते खिंडीत रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्यामुळे या रस्त्यावरून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत होता. यापूर्वी या खड्ड्यांमुळे अनेक लहान-मोठे अपघात घडले असून वाहनांचेही मोठे नुकसान होत होते. नागरिकांकडून या समस्येबाबत सातत्याने तक्रारी येत होत्या. मात्र, संबंधित विभागाकडून कामाला विलंब होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती.

या गंभीर प्रश्नाची दखल घेत महाराष्ट्र नवनिर्माण सेना महाड तालुका अध्यक्ष मंगेश शिंदे यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांशी वारंवार संपर्क साधून तातडीने काम सुरू करण्याची मागणी केली होती. तसेच, आठ दिवसांच्या आत रखडलेले काम सुरू न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला होता.

या पाठपुराव्यानंतर अखेर बुधवारपासून नाते खिंडीतील रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. हे काम दर्जेदार व निर्धारित वेळेत पूर्ण करावे, तसेच भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी संबंधित यंत्रणांनी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी मनसेकडून करण्यात आली आहे.

दरम्यान, रस्त्याचे काम सुरू झाल्यामुळे नाते खिंडीतून प्रवास करणाऱ्या हजारो वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मनसेने केलेल्या पाठपुराव्याचे नागरिकांनी स्वागत केले आहे.

## पीकस्पर्धेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**पाताळगंगा :** राज्यातील शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून पिकांची उत्पादकता वाढवावी, या उद्देशाने कृषी विभागामार्फत खरीप हंगाम २०२६ अंतर्गत राज्यस्तरीय अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पीकस्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. ही अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली असून, स्वतंत्र पोर्टलवरून अर्ज स्वीकारले जाणार आहेत. खालापूर तालुक्यात भात (धान) आणि नाचणी (रागी) या पिकांसाठी स्पर्धा होणार असून. भातासाठी किमान २० गुंठे तर नाचणीसाठी ४० गुंठे सलग लागवड क्षेत्र असणे आवश्यक आहे. शेतकऱ्याच्या नावावर जमीन असणे व ती स्वतः कसत असणे बंधनकारक आहे. फार्मर आयडी, प्रवेश शुल्काची पावती, बँक खात्याचा तपशील तसेच आदिवासी शेतकऱ्यांसाठी जात प्रमाणपत्र ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

### निवडक

## जागतिक आदिवासी दिनाचे आयोजन



**वेणगाव :** कर्जत तालुक्यातील आदिवासी महादेव कोळी समाज, आदिवासी ठाकूर समाज, आदिवासी कातकरी समाज व तरुण वर्ग एकत्र येत रविवारी (दि.२) रामाचीवाडी धानकोबा मंदिर येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला सर्वांनी सहमती दाखवून नऊ ऑगस्टच्या दिवशी जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे ठरवले आहे. यावेळी आदिवासी समन्वय समिती तयार करून जागतिक आदिवासी दिनाची सर्व जबाबदारी समितीकडे सोपवण्यात आली आहे. या सभेला सर्वांनी सहमती दाखवून नऊ ऑगस्टच्या दिवशी जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्याचे ठरवले आहे. जागतिक आदिवासी दिनादिवशी रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच प्रशासकीय अधिकारी यांना आदिवासी समस्याविषयी निवेदन देण्यात येतील. त्याचवेळी आदिवासी संस्कृतीक, रुढी परंपरा जपणारे धामडी नाच, गैरी नाच, डब्यावरचा नाच, महिलांचा टाळ्यांवरचा नाच, फुगडी, यासारखे आदिवासी संस्कृती जपणारे कार्यक्रमही होतील.

## मच्छीमार बांधवांसाठी आरोग्य शिबीर

**कोर्लई :** मुरुड तालुक्यातील नांदगाव आयुष हॉस्पिटल व भारतीय तटरक्षक दल यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथील आरसीएफच्या हॉलमध्ये येथे भव्य मोफत आरोग्य शिबीर व सामुदायिक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला पोलिस अधीक्षक आंचल दलाल, आयुष हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ.अनिल गोस्वामी, भारतीय तटरक्षक दलाचे कमांडिंग अधिकारी जयदीप पॉल मान्यवर उपस्थित होते. या शिबिरादरम्यान आरोग्य जनजागृती, निरोगी जीवनशैली, रोगप्रतिबंध, नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व तसेच वैयक्तिक आरोग्य समुपदेशन करण्यात आले तसेच जनरल मेडिसिन, जनरल सर्जरी, ऑर्थोपेडिक सर्जरी, दंतचिकित्सा तसेच इतर विविध तज्ज्ञ विभागांतील डॉक्टरांनी सहभाग घेत नागरिकांना सर्वसमावेशक आरोग्यसेवा दिली. तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला तसेच गरजेनुसार मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. या आरोग्य शिबिराला मच्छीमार समाजाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून सुमारे १५० मच्छीमार कुटुंबांनी शिबिराचा लाभ घेतला.

# मंत्र्यांच्या दौऱ्यापूर्वी खड्डे बुजविण्याची लगबग

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**



पनवेलमधील अमरधाम ते खांदा कॉलनी येथील एसकेटी महाविद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर गेल्या अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. या खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. वारंवार तक्रारी करूनही या रस्त्याची दुरुस्ती झाली नव्हती.

मात्र, बुधवारी एसकेटी महाविद्यालयात राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्या उपस्थितीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, त्या पार्श्वभूमीवर आज अचानक रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेण्यात आले. विशेष म्हणजे, हे काम पनवेल महानगरपालिकेकडून नव्हे, तर टीआयपीएल कंपनी मार्फत करण्यात येत असल्याचे पाहायला मिळाले.

यामुळे सामान्य नागरिकांसाठी नाही, तर केवळ व्हीआयपींच्या दौऱ्यापूर्वीच प्रशासन जागे होते का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अनेक दिवस दुर्लक्षित राहिलेल्या रस्त्याची दुरुस्ती मंत्र्यांच्या आगमनाच्या पूर्वसंध्येलाच करण्यात आल्याने पनवेल महानगरपालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नागरिकांच्या दैनंदिन सुरक्षिततेपेक्षा मान्यवरांच्या दौऱ्यांना अधिक प्राधान्य दिले जात असल्याची भावना व्यक्त होत असून, रस्त्यांची देखभाल ही केवळ व्हीआयपी भेटीपुरती मर्यादित न ठेवता नियमितपणे करण्यात यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

## पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा



**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

भोराई शिक्षण प्रसारक मंडळ सेवक सह. पतसंस्था मर्यादित, नांदगाव यांची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवारी (दि.५) संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगाव येथे मोठ्या उत्साहात पार पडली. या सभेस पतसंस्थेचे संस्थापक सुरेशशेठ खैरे, माजी प्राचार्य संभाजी ढोपे, बबन पालवे, विद्यमान प्राचार्य अशोक शिंदे तसेच पतसंस्थेचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते. सभेच्या सुरुवातीला पतसंस्थेचे संस्थापक सुरेश खैरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत सभेला सुरुवात झाली. सभेचे प्रास्ताविक विद्यमान प्राचार्य अशोक शिंदे यांनी केले. त्यांनी पतसंस्थेच्या गेल्या वर्षभरातील कामगिरीचा आढावा सादर केला. त्यानंतर संस्थापक सुरेश खैरे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सभासदांना आर्थिक शिस्त, बचतीचे महत्त्व आणि पतसंस्थेच्या प्रगतीबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

## ज्येष्ठ नागरिक मंडळाचा वर्धापन दिन



**कोलाड :** स्नेह ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळ कोलाड यांचा १६ वा वर्धापन दिन सोमवारी (दि.३) राजेश्री वसंत महाबळे यांच्या वसाहत टेरेसवर साजरा करण्यात आला. या कार्यक्रमानिमित्ताने सामाजिक वन्यजीवरक्षणार्थ सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सागर दहिंबेकर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर युनिव्हरसिटी लोणेरे येथील इलेक्ट्रॉनिक डिप्लोमामध्ये आलेल्या सुकन्या निलेश महाबळे ९९.३० टक्के गुण प्रथम, चंदना महेश म्हसकर द्वितीय तर कॉप्युटर इजिरिंगमध्ये ९६.७० टक्के गुण मिळवून प्रथम आलेल्या जान्हवी प्रशांत बामुगडे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच ७५ वर्षे पूर्ण झालेल्या २७ जेष्ठ नागरिकांना आधार काठी तसेच विवाहाला ५० वर्षे पूर्ण झालेल्या जोडप्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नवीन सभासद यांचा ही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते प्रमोद म्हसकर व नंदकुमार पवार यांचे विशेष सहकार्य लाभले.

## लोकशाहीर आण्णाभाऊ साठेंना अभिवादन

**रसायनी :** साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंतीनिमित्त रसायनी परिसरातील मोहोपाडा येथील शिवाजी चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायत कार्यालय सभागृहामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच उमा संदीप मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले.

यानंतर तुराडे ग्रामपंचायत कार्यालयात येऊन अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करून अण्णाभाऊ साठे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला. नंतर गुळसुंदे ग्रामपंचायत येथे अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करण्यात आली. यानंतर वावेघर येथे कार्यकर्त्यांच्या हस्ते सहकार्य लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करण्यात आली.

# आपटा गावासाठी नवीन बस सेवा सुरू

**। आपटा । प्रतिनिधी ।**

पनवेल ते आपटा सांवळामार्गे अशी एसटी बस रात्री उशिरा म्हणजे रात्री नऊ वाजता नवीन बस फेरी सुरू करण्यात आली आहे. ही बस सेवा सोमवारी (दि.३) पासुन सुरु झाली आहे. ही बस रात्री ९ वा पनवेल आगारातून सुटून आपटे येथे जाते आणि पुन्हा लगेच आपटे येथून पनवेलला जाते. या बसचा लाभ आपटे, लाडीवली, गुळसुंदे, तुराडे, रसायनी, सावळे, कोन या मार्गावरील रोज येणाऱ्या व जाणाऱ्या प्रवाशांना होणार आहे. ही बस सुरू करण्यासाठी सध्याचे पनवेल आगाराचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी प्रामाणिकपणाने सहकार्य केले. त्यांनी सतत केलेल्या प्रयत्नांमुळे आणि पाठपुराव्यामुळे ही बससेवा सुरू झाली. त्याचप्रमाणे या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांतर्फे मिनेश व महेश गाडगीळ यांनीदेखील विनंती अर्ज देण्यापासून सतत पाठपुरावा केला होता. बस डेपोचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी केलेल्या सहकार्यासाठी ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले.

# वाजेकर महाविद्यालयाचे उल्लेखनीय यश

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**




रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाच्या ५९ व्या युवा महोत्सवाच्या रायगड झोनसाठी सोमवारी (दि.३) रामशेठ ठाकूर कॉमर्स अँड सायन्स कॉलेज खारघर येथे झालेल्या फाईन आर्ट या विभागातील क्ले मॉडेलिंग, पोस्टर मेकिंग, कार्टूनिंग या स्पर्धा प्रकारांमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. प्रथमेश सदानंद म्हात्रे एम.एस.सी. झूलॉजी या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक तसेच ऑन दि स्पॉट पेंटिंग या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. प्रथमेश म्हात्रे याने सन २०२५-२६मध्ये मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करून फाईन आर्ट या विभागामध्ये राष्ट्रीय स्तरावर मुंबई विद्यापीठाला चॅम्पियनशिप प्राप्त करून दिली आहे. त्याचबरोबर कुणाल वैभव पाटील एफ. वाय.बी.एस.सी याने तालवाद्य या स्पर्धा प्रकारात प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. त्यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य मा. रामशेठ ठाकूर रायगड विभागीय चेअरमन मा. बाळाराम पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष मा. पी.जे. पाटील, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य माननीय भावना घाणेकर, मा. सुधीर घरत जनरल बॉडी सदस्य यांनी अभिनंदन केले.

## वृक्षारोपणासह शैक्षणिक साहित्य वाटप



**म्हसळा :** रायगड जिजामाता शिक्षण संस्था वरवठणे-आगरवाडा येथे सोमजाई माता क्रीडा मंडळ खरसई ट्रस्टच्या वतीने सालाबादप्रमाणे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शाळा परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रमही उत्साहात पार पडला. यावेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महादेवराव पाटील यांनी सोमजाई माता क्रीडा मंडळाच्या सातत्यपूर्ण सामाजिक, शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातील कार्याचे कौतुक केले.ही संस्था अनेक वर्षांपासून तळागाळातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, क्रीडा प्रोत्साहन आणि विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून मोलाचे योगदान देत आहे. तालुक्यापुरते मर्यादित न राहता राज्यस्तरावरही संस्थेने उल्लेखनीय कार्य करून नावलौकिक मिळविला आहे असे गौरवोद्गार त्यांनी काढले. कार्यक्रमादरम्यान मान्यवर व विद्यार्थ्यांच्या हस्ते शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षण ही काळाची गरज असून प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. शैक्षणिक साहित्य वाटप आणि वृक्षारोपण या दुहेरी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

# वडाळे सरोवर जलपर्णीच्या विळख्यात

## ● पावसाळ्यात तलावाचे गवताळ प्रदेशात रूपांतर

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**



वडाळे सरोवरातील जलपर्णीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने मे महिन्यात राबविलेला शास्त्रीय तणनिर्मूलनाचा अभिनव प्रयोग सध्या अपुरा ठरत असल्याचे चित्र समोर आले आहे. जैविक नियंत्रणासाठी तलावात सायंटोबॅगस सल्वीनी या कीटकांचा विसर्ग करण्यात आला होता. या प्रयोगानंतर अवघ्या महिनाभरात जलपर्णीचा रंग बदलल्याने हा प्रयोग यशस्वी ठरण्याची चिन्हे दिसत होती. मात्र, पावसाळ्याला सुरुवात होताच जलपर्णीने पुन्हा डोके वर काढले असून, संपूर्ण वडाळे सरोवर हिरव्या गालिच्याने झाकल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

सध्या तलावाकडे पाहिल्यास पाण्याचा मागमूसही लागत नाही. संपूर्ण तलाव गवताळ प्रदेशात बदलल्याचा भास होत असून, अशी परिस्थिती यापूर्वी कधीही पाहायला मिळाली नसल्याचे स्थानिक नागरिक सांगत आहेत. त्यामुळे जैविक पद्धतीने राबविण्यात आलेल्या तणनिर्मूलन मोहिमेच्या परिणामकारकतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. जलपर्णीची झपाट्याने वाढ झाल्यास तलावातील विरघळलेल्या प्राणवायूचे प्रमाण कमी होऊन जलचरांच्या अस्तित्वावर परिणाम होऊ शकतो. तसेच तलावातील जैवविविधता आणि पर्यावरणीय समतोलही धोक्यात येण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेने तातडीने परिस्थितीचा आढावा घेऊन जलपर्णी हटविण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी पर्यावरणप्रेमींसह नागरिकांकडून होत आहे.

## गुणगौरव, शैक्षणिक मार्गदर्शन सोहळा

**पाली/गोमाशी :** सह्याद्री आदिवासी ठाकूर समाज संस्था, सुधागडपाली यांच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव सोहळा व शैक्षणिक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ठाकूर समाजातील विविध वाड्या-वस्त्यांमधील तसेच शासकीय वसतिगृहांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक, शिक्षक व समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष गोविंद लेंडी होते. प्रमुख पाहुणे म्हणून नयन वाघ, सहाय्यक राज्य कर आयुक्त व चंद्रकांत वारगुडे, जिल्हा परिषद सदस्य उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून उत्तम डोके, सहाय्यक अभियंता, मुंबई महानगरपालिका तसेच सुधागड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षणाचे महत्त्व, स्पर्धा परीक्षांची तयारी, करिअरच्या संधी, व्यक्तिमत्त्व विकास यावर त्यांनी मोलाचे विचार मांडले. त्यानंतर दहावी, बारावी, पदविका, पदवी तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

## वेटलीज बसचालकांसाठी प्रशिक्षण

**मुंबई :** मानखुर्द येथे नुकत्याच घडलेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर, दि.२४ जुलै रोजी सर्व वेट लीज कंत्राटदरांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली. त्यानुषंगाने, बेस्ट उपक्रमामार्फत बेस्ट मार्गावर कार्यरत असलेल्या सुमारे ५,२०० वेट लीज बस चालकांसाठी विशेष सुरक्षा जनजागृती व प्रशिक्षण मोहीम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचा उद्देश चालकांमध्ये सुरक्षित व संरक्षणात्मक वाहनचालना पद्धतींचा अवलंब वाढविणे तसेच रस्ते सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणे हा आहे. प्रशिक्षणामध्ये लेन शिस्तीचे पालन, लेन कटिंग टाळणे, वेगमर्यादेचे काटेकोर पालन, सुरक्षित अंतर राखणे तसेच वाहन चालविताना मोबाईल फोनचा वापर पूर्णतः टाळणे आदी बाबींवर विशेष भर देण्यात येणार आहे.ही मोहीम सर्व वेटलीज आगारामधे तसेच दिंडोशी प्रशिक्षण केंद्रामधेसुद्धा वेटलीज कंत्राटदार यांच्या समन्वयाने राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये विशेष करून समुपदेशन सत्रे, सुरक्षितता मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिक प्रशिक्षण कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सातत्यपूर्ण प्रशिक्षण व जनजागृतीमुळे अपघातांमध्ये लक्षणीय घट होऊन मुंबईची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित होण्यास मदत होईल, असा विश्वाम बेस्ट प्रशासनाने व्यक्त केला आहे.

### धारावीत उभे राहणार हरित नेटवर्क | ४० हजार वृक्षांची लागवड करणार

# मिठी नदीचा होणार कायापालट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत मुंबईकरांसाठी आणि विशेषतः धारावीतील रहिवाशांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून धारावीचा चेहरामोहरा बदलतानाच पर्यावरणाचा समतोल राखण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. मिठी नदीचे पुनरुज्जीवन हा या संपूर्ण उपक्रमाचा मुख्य कणा ठरणार असून, यासाठी तब्बल ४० हजार वृक्षांचा आधार घेतला जाणार आहे.

या हरित परिवर्तनाचा एक भाग म्हणून मिठी नदीच्या लगत ३.३ किमी लांबीचा भव्य आणि आकर्षक सार्वजनिक फेरफटका मार्ग साकारण्यात येणार आहे. हा मार्ग माटुंगा कल्व्हर्टपासून थेट मिठी नदीच्या मुखापर्यंत विस्तारलेला असेल. सर्व मुंबईकरांसाठी खुला असणाऱ्या या नदीकिनाऱ्यावर निरीक्षण मंच, कॅफे आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांसाठी विशेष जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

मिठी नदीकिनारा अधिक सक्षम आणि निसर्गरम्य करण्यासाठी स्थानिक प्रजातींची झाडे आणि प्रदूषण शोषून घेणाऱ्या वनस्पतींची लागवड केली जाईल. याशिवाय पावसाच्या पाण्याचे नियोजन, भूजल पुनर्भरण वाढवणे आणि नदी परिसंस्थेच्या आरोग्यासाठी पारग्य फरसबंदी आणि बायोस्वेल्स यांसारख्या आधुनिक उपाययोजना राबवल्या जाणार आहेत. तसेच, नदीकिनारा पादचारी व सायकलस्वारांसाठी तयार करण्यात येणाऱ्या १५ मीटर रुंदीच्या ग्रीन स्पाइन आणि एका मोठ्या सेंट्रल पार्कशी जोडला जाणार आहे.

### वृक्षतोडीच्या पाचपट नवी झाडे

धारावी आणि परिसरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी तसेच शहरी तापमान कमी करण्यासाठी टप्प्याटप्प्याने ४०००० वृक्षांचे पुनरुज्जीवन आणि लागवड केली जाणार आहे. पुनर्विकासादरम्यान होणाऱ्या प्रस्तावित वृक्षतोडीच्या तुलनेत ही संख्या जवळपास पाचपट आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पुरेशी जागा उपलब्ध नसल्यामुळे मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) एकूण दोन लाख प्रतिपूरक वृक्षांची लागवड करण्याचे नियोजन आहे.

### दर सहा महिन्यांनी होणार अहवाल सादर

प्रतिपूरक वनीकरणाचा एक भाग म्हणून पालघर जिल्ह्यातील चहाडे गावात आधीच ३० हजार वृक्षांची यशस्वी लागवड करण्यात आली आहे. चालू पावसाळ्यात एकूण ७५ हजार वृक्षांची लागवड करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या संपूर्ण वृक्षलागवडीची आणि पाच वर्षांच्या संगोपनाची जबाबदारी अदाणी नवभारत डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड उचलणार आहे. यासाठी टेराकॉन या पर्यावरण सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आली असून, दर सहा महिन्यांनी वृक्षांच्या अस्तित्वाचा अहवाल सादर केला जाणार आहे.

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

संकिर्ण अर्ज ३७/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
१. श्री. सुनिल परशुराम फुलारे
रा.यसदे, ता. मुरुड जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

१. फकी हसन अब्दुल्ला मुल्ला
२. खतिजा फ. अ. सत्तार मुल्ला — सामनेवाले
३. केसर जरीफ खतिब
रा. येसदे, ता.मुरुड जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी मौजे येसदे, ता. मुरुड, जि.रायगड येथील स.नं. ७/६ ह्या मिळकतीच्या इतर अधिकारात दाखल असलेले साधना परशुराम फुलारे, सुनिल परशुराम फुलारे, सुशिल परशुराम फुलारे, सुनिता परशुराम फुलारे या नाव कब्जेदार सदरी नोंद करुन मिळणेकामी अर्ज या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे.

त्यानुषंगाने या न्यायालयाकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम १४९ व १५० कामकाज चालविण्यात येत आहे. सदर प्रकरणी सुनावणी नोटीस देऊनही सामनेवाले न्यायालयात उपस्थित राहिलेले नाहीत.

तरी मौजे येसदे, ता.मुरुड, जि. रायगड येथील स.नं. ७/६ ह्या मिळकतच्या इतर अधिकारात दाखल असलेले साधना परशुराम फुलारे, सुनिल परशुराम फुलारे, सुशिल परशुराम फुलारे, सुनिता परशुराम फुलारे या नाव कब्जेदार सदरी नोंद करणेबाबत हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०५/०८/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे व तशी बोलणी आमच्या अशीलानी केली आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाच्या आत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी खताचा व्यवहार पुर्ण करतील. दिलेल्या मुदतीत हरकत न घेतल्यास मागावून आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | भूमापन व उपविभाग क्र | क्षेत्र हे आर चौ.मी | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|
| सौ सुचिता सुमित पाटील, श्री श्रीधर जयवंत पाटील, सौ.मोसमी श्रीधर पाटील | ८९/२ | ०.९२.२०<br>०.०७.२०<br>०.९९.४० | ८.७६ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता: शॉप नं.१०, तळमजला, पंकज रेसिडेन्सी, आगरी समाज हॉलच्या बाजूला, नेरळ साई मंदिर, नेरळ ता.कर्जत, जि.रायगड. ४१०१०१ दिनांक :- ०५/०८/२०२६

सही /-
**ॲड श्री जयेंद्र पांडुरंग कराळे**
मो.नं.९२२२५२२२९२

### जाहिरात

सर्व तमाम बिल्डर्स अँड डेव्हलपर्स (विकासक) यांना या जाहिरातीने सुचित करण्यात येते की, जुना स.नं./भूखंड नं. ८अ/१ +९/२ भूखंड क्र. ०८ नविन स.नं./भूखंड नं. २०/१/अ/८ क्षेत्र ५६३.२० चौरस मिटर, मौजे मुद्रे- खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील भूखंडावर प्रस्तुत विद्यमान मालक श्री गणेशकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. जिचा नोंदणी क्रमांक आरजीडी/केजेटी/एचएसजी/(टीसी)/२००२/२००६-२००७/सन २००७. दिनांक २९.०३.२००७ आहे. आम्ही आमची इमारत पुर्नबांधणीसाठी देण्याचे दिनांक ०२/०८/२०२६ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक ३ नुसार सर्वानुमते निश्चित केले आहे. त्यासाठी संस्थेने बिल्डर्स अँड डेव्हलपर्स (विकासक) यांचेकडून स्वारस्य पत्र (इंटरेस्ट लेटर) या जाहिरातीने मागवत आहोत. ज्या विकासकाला इमारत पुर्नबांधणीमध्ये स्वारस्य आहे त्या विकासकाने सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खाली सही करणार इमारत पुर्नबांधणी कार्यकारी मंडळ १) श्री.सुश्रुत रमेश भोपतराव (मो.नं.९३७३८९६७९५), २) श्री.विलास बबन शिंदे (मो.नं.९८५०३८७११८), यांच्याशी संपर्क साधुन श्री गणेशकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सदनिका क्रमांक ००२, तळ मजला, मौजे मुद्रे-खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१० २०१ येथे आपल्या निवेदिका विहीत मुदतीत सदर पत्त्यावर यांचेकडे पाठवावे. सदर प्रक्रियेसाठी संस्थेकडे खालील कागदपत्रे उपलब्ध आहेत.

१.संस्थेचे नोंदणीपत्र.२.मालमत्ता पत्रक. ३.बांधकाम परवानगी. ४.इमारत नकाशा. ५. संस्थेच्या अटी व शर्ती ६. दिनांक ०२/०८/२०२६ रोजीचा संस्थेचा ठराव क्रमांक २ ची छायांकित प्रत. ७. संस्थेतील सभासदांची यादी

| अनु. क्रमांक | सभासदाचे नाव | सदनिका क्रमांक | दस्त क्रमांक | बिल्टप क्षेत्र | कारपेट |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

सही/-
**सचिव**
**श्री गणेशकृपा को-ऑप.हौ.सो.लि**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे पाल्हे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक ज्ञानदिप बंडू दिवेकर, रा. १४/१०/पी.एल.-६ अ, सेक्टर १, खांदा कॉलनी, न्यू पनवेल, जि. रायगड व सौ. निलिमा राजेंद्र पाटील, रा.जे/३०३, भूमीराज अबोडे को.ऑ. हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. १४, सेक्टर १५, पामबीच रोड, सानपाडा (पूर्व) यांच्या नावे असलेली बिनशेती मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा करार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| पाल्हे ता. अलिबाग | ६६/१/२ प्लॉट नं. ९ | २-१६-०० | २१.६० |
| | एकूण | २-१६-०० | |

सबब सदरहू बिनशेती मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू वरकस मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून ०७ (सात) दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे गृहित धरून माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ५/०८/२०२६

सही/-
**ॲड. राहुल रमण महाले**
श्रीबाग नं. २ इ-१५ अंबामाता मंदिराजवळ
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
८०८७५७८०६९

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाच्या मौजे तळवली, ता.मुरुड येथील मिळकती, त्या मिळकतींचे विद्यमान मालकांकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| तळवली | २६१ | ०-१२-२०<br>पो.ख.०-००-२०<br>**०-१२-४०** | रु.१.१२ | चंपालाल मांगीलालजी जैन. |
| तळवली | २६०/१ | १-१५-८०<br>पो.ख.०-२६-००<br>**१-४१-८०**<br>**पैकी २० आर** | रु.८.८९ | १) विनोदकुमार चंपालाल जैन,<br>२) हितेश चंपालाल जैन. |
| तळवली | २५३ | ०-३८-७०<br>पो.ख.०-०२-८०<br>**०-४१-५०** | रु.१०.०६ | १) विनोदकुमार चंपालाल जैन.<br>२) हितेश चंपालाल जैन. |
| तळवली | २६४ | ०-४०-००<br>पो.ख.०-०१-००<br>**०-४१-००** | रु.९.२५ | १) विनोदकुमार चंपालाल जैन.<br>२) हितेश चंपालाल जैन. |

सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकत या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०६/०८/२०२६

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा.वत्सला, टिळक रोड, स्टेट बँके समोर,
अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी कात ९/आवक क्र.१६३३/२०२६

श्री. महेंद्र निवृत्ती कांबळे,
रा.भालगुल पो.तिवरे ता. सुधागड जि. रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत परळी
ता.सुधागड. जि.रायगड — सामनेवाले

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे**
**जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की श्री. महेंद्र निवृत्ती कांबळे, रा. भालगुल पो.तिवरे ता.सुधागड जि.रायगड यांनी त्यांचा मुलगा अजिंक्य महेंद्र कांबळे यांचा जन्म दिनांक १०/०७/१९९३ रोजी मौजे नानोसे ता.सुधागड जि.रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करून त्यांच्या जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर अजिंक्य महेंद्र कांबळे यांच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- ०५/०८/२०२६

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

ज.म.र अर्ज ३९५/२०२६

### जाहिर नोटीस

प्रति,
श्री. मनसूर फारुकमिया घारे, — अर्जदार
रा. मांडला- बोर्ली, ता. मुरुड-जंजिरा,
जि. रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत मांडला,
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ३१-०७-१९७९ रोजी मौजे मांडला, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत मांडला, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. ३१-०७-१९७९ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २५/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.२३/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे.

सही/-
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

दिनांक ०५/०८/२०२६

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे श्रीगांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकती ह्या आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १. सौ. शांता हरिश्चंद्र जुईकर, २. सौ. रोशनी प्रशांत पाटील यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे श्रीगांव, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| श्रीगांव, ता.अलिबाग | ४२७ | क्षेत्र १-००-४०<br>पो.ख. ०-१२-४०<br>एकूण क्षेत्र १-१२-८० | ७.५० |

वर नमुद मिळकतीपैकी क्षेत्र ०-९०-०० हे.आर. ही मिळकत

दिनांक : ०५/०८/२०२६

**ॲड. चैतन्य सुरेश पाटील**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
मोबा.नं. ७५०७७८००४६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चई, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ४/१ | एकूण क्षेत्र ०-५४-०० हे.आर | ०.३७ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-०६/०८/२०२६

सही
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

दिनांक : ०५/०८/२०२६

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकती ह्या आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री.नरेश भवानजी छेडा यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वरंडे, ता.अलिबाग | ५०४ | क्षेत्र ०-९९-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-९९-०० | २.०६ |
| | ५०५ | क्षेत्र १-२३-२०<br>पो.ख. ०-००-५०<br>एकूण क्षेत्र १-२३-७० | ४.८७ |

दिनांक :- ०५/०८/२०२६

सही/-
**ॲड. चैतन्य सुरेश पाटील**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
मोबा. नं. ७५०७७८००४६

नि १९४/ड
ने ता.- ०४/०९/२०२६
वादी वकील ॲड. जयंत ह.चेऊलकर

### जाहीर नोटीस
**उरण येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु. डी. साो. यांचे कोर्टात**

रेग्युलर मुकदमा नं.११८/२०२१
निशाणी क्र. १९४/ड

श्री.योगेश वितळे — वादी.

विरुद्ध

श्री.प्रताप वेलकर वगैरे, — प्रतिवादी

प्रति,
प्रतिवादी.

१०) श्री. संजय काशिनाथ म्हात्रे,
वय ७६ वर्षे, धंदा :- व्यवसाय,
११) सौ. सुदेष्णां संजिव म्हात्रे,
वय ४४ वर्षे, धंदा :- गुहिणी,
क्र. १० व ११ रा. करंजा,
ता.उरण, जि.रायगड.
१२) श्री. धनेश काशिनाथ म्हात्रे,
वय ४८ वर्षे, धंदा :- व्यवसाय,
१३) सौ. दिप्ती धनेश म्हात्रे,
वय ४३ वर्षे, धंदा :- गृहिणी,
क्र. ३ व ४ रा. १७३-अ, करंजा,
ता. उरण, जि. रायगड.
१४) सौ. अश्विनी विशाल गायकवाड,
वय ३८ वर्षे, धंदा :- गृहिणी,
रा. ५६-अ, गुरूकृपा निवास,
गणेश हौ. सोसा., उरण,
ता. उरण, जि. रायगड.
३३) सौ. मनिषा संतोष थळे,
वय ४० वर्षे, धंदा :- गृहिणी,
रा. १६२, श्री समर्थ कृपा, करंजा,
उरण, ता. उरण, जि. रायगड.
३४) श्री. प्रमोद शांताराम अडूरकर,
वय ७३ वर्षे, धंदा :-मोलमजुरी
३५) सौ. वनिता प्रमोद अडूरकर,
वय ५० वर्षे, धंदा :- गृहिणी,
क्र. ३४ व ३५ रा. बेलदारवाडा भवरा,
उरण, ता. उरण, जि. रायगड.
३६) सौ. अभिलाषा निखिल म्हात्रे,
वय ३१ वर्षे, धंदा :- गृहिणी,
रा.करंजा, उरण, ता.उरण, जि.रायगड.

सदरील वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुद्ध मे. सिव्हील जज्ज ज्युनीअर डिव्हीजन साो. उरण, रायगड यांचे कोर्टात दाखल केला असून या दाव्यामध्ये सुनावणीकरिता पुढील तारीख ०४/०४/२०२६ नियुक्त करण्यांत आलेली आहे.

सदरचे दाव्याच्या सुनावणीकामी प्रतिवादी नं. १० ते १४ व ३३ ते ३६ ह्यांस वरील पत्त्यावर नोटीसा काढल्या असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. त्यामुळे दाव्याच्या सुनावणीचे काम प्रलंबित आहे.

तरी या नोटीसीद्वारे प्रतिवादी नं. १० ते १४ व ३३ ते ३६ ह्यांस कळविणेत येते की, सदर दाव्याचे सुनावणीची पुढील तारीख ०४/०९/२०२६ आली आहे. सदर तारखेस सदर वेळेस तुम्ही स्वत: अगर तुमचे तर्फे तुमचे एजंट, वकिल वगैरे यांचेमार्फत हजर रहावे व आपले म्हणणे मांडावे अन्यथा तुम्हांस सदर दाव्याचे कामी काही एक सांगावयाचे नाही असे समजून दाव्याची सुनावणी एकतर्फी घेऊन योग्य तो निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यांत आज दिनांक ०३/०८/२०२६ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी प्रसिद्ध केली आहे.

उरण
दिनांक : ०३/०८/२०२६

सही/-
**कनिष्ठ लिपिक**

सही/-
**अधिक्षक**
**सिव्हील जज्ज ज्युनीअर डिव्हीजन**
**कर्जत रायगड**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे दिघाटी, ता. पनवेल, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ५०/६/अ | एकूण क्षेत्र ०-१६-०० हे.आर | ०.४७ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-०६/०८/२०२६

सही /-
**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविणेत येते की, विद्यमान जमीन मालक, १) अरूण हरी ताम्हणकर, २) प्रज्ञेश माधव वैद्य, ३) योगेश माधव वैद्य, ४) नितीन कृष्णाजी वैद्य, ५) महेश कृष्णाजी वैद्य, ६) विजयालक्ष्मी कृष्णाजी वैद्य, ७) वैशाली सुहास सप्रे, ८) प्रणव सुधीर गोखले आणि ९) स्नेहा सुधीर गोखले, यांच्या ताबेकब्जातील, वहीवाटीतील, त्यांच्या सामाईक मालकी हक्कात असलेली खालील परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडून कायम स्वरूपी खरेदी करणेचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे :-

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे कराडे खुर्द, तहसिल पनवेल, जिल्हा रायगड येथील उपविभाग**

| गट क्र. | उपविभाग | क्षेत्र | | | आकारणी रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक हे.आर.चौ.मी. | पोट खराबा हे.आर.चौ.मी. | एकूण हे.आर.चौ.मी. | |
| १७ | - | ३-४१-०० | ०-०५-०० | ३-४६-०० | २१.०६ |

वरील वर्णनाच्या जमीनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहीत आहे असे समजणेत येवून सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०५/०८/२०२६

**ॲड.अतुल तुकाराम भोपी**
कार्यालय :- १०४, साई लिला, माणेक नगर को-ऑप. हौ.सोसायटी समोर, महाराणा प्रताप रोड, परदेशी आळी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड, ४१०२०६.
मो.नं. ९३२४६७९५०७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक सौ. वृंदा विनायक मराठे व श्री. शैलेश विनायक मराठे, मु. मराठे वाडी, नाईक आळी, वरसोली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, ४०२२०१ यांच्याकडून खरेदी घेण्याबाबत व्यवहार करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | सिटी सर्व्हे नं. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड | अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र.ALB000001717(06) जुना नं. Z1MKT001719, (जुना घर क्र.१४५६) | ९५१/अे, ९५१/बी, के/९५१ | ११.४४ चौ.मीटर |

ही मिळकत या नोटीसचा विषय आहे. अलिबाग नगरपरिषद हद्दीतील मौजे अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील सिटी सर्व्हे नं. ९५१/अे ९५१/बी के/९५१ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या 'सुभेदार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित' या इमारतीमधील तळ मजल्यावरील दुकानगाळा नं. ६, बिल्टअप क्षेत्रफळ ११.४४ चौ. मीटर, ज्याची अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. ALB000001717(06) जुना नं.Z1MKT001719, (जुना घर क्र. १४५६) या वाणिज्य दुकानगाळा मिळकतीचे अभिहस्तांतरण, सुभेदार सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित ह्या सोसायटीचे सभासदत्व, शेअर्स व लाभांशहित प्राप्त झालेले आहे.

सदरची मिळकत निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क (जाण्या-येण्याचा मार्ग) या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित सादर करावी.

उक्त मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांनी कळावे.

अलिबाग
दिनांक : ०५/०८/२०२६

सही/-
**ॲड. किरण बावनकर**
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा. ९२८४७०६७९१/९६०४३११९२२

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री पवन सत्यपाल कत्याल यांनी विद्यमान मालक विनीत हरेश मतलानी यांच्या मालकीची मिळकत त्यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे तशा आशयाचा करार त्यांचेबरोबर केलेला आहे. कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | सत्ता प्रकार |
|---|---|---|---|
| गोवेले, तालुका माणगाव-रायगड | १०७० | ०-३८-०० | १ |

पैकी विनीत हरेश मतलानी यांचे मालकीची मिळकत जाहिर नोटिसचा विषय आहे. वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. सदर मिळकतीचा व्यवहार केला जाईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. मानसी महेश गुंजाळ**
**ॲड. महेश म. गुंजाळ**
ए /१०४ श्री साईकृष्णा, को.ओप.हा.सो.सावरकर चौक,
नवीन कोर्टाजवळ, जुने पनवेल, रायगड- ४१०२०६
मोबा. ९८२२०१३३५०., ७५८७७१३९११


**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# निवडक

## गुरुकुल अकॅडमीची दमदार कामगिरी



**महाड :** हरियाणा येथे आयोजित करण्यात आलेल्या '१३व्या स्टुडंट्स ऑलंपिक नॅशनल गेम्स २०२६' स्पर्धेत महाड येथील हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट संचलित गुरुकुल अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत एकूण १४ पदकांची कमाई केली आहे. या यशामध्ये ४ सुवर्ण, ४ रौप्य आणि ६ कांस्यपदकांचा समावेश असून, खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर महाडच्या क्रीडा क्षेत्राचा नावलौकिक उंचावला आहे. हिरवळ एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे, प्रशिक्षकांचे अभिनंदन केले आहे. सुवर्णपदक विजेते श्रद्धा सावंत, कनिष्का साळुंखे, यश दासगावकर, सार्थक मोरे. रौप्यपदक विजेते रक्षंदा भंडारी, सचिन मोरे, आर्यन कोतकर, देवांक्ष पारटे. कांस्यपदक विजेते प्रांजल धोंडगे, अपूर्वा कलगुडे, विभा शिरके, स्वरीत ताडकर, रुद्र जाधव, अनिकेत गोठल. या राष्ट्रीय स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीमुळे गुरुकुल अकॅडमीच्या खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठीची दावेदारी अधिक भक्कम झाली आहे. विद्यार्थ्यांची जिद्द, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा विश्वास यामुळे हे यश मिळाल्याची भावना अध्यक्ष किशोर धारिया यांनी व्यक्त केली असून, सर्व विजेत्या खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## चंद्रपुरात खेलो इंडिया निवड चाचणी

**चंद्रपूर :** खेलो इंडिया उपक्रम अंतर्गत जिल्हा क्रीडा संकुल, चंद्रपूर येथे जिल्हास्तरीय मैदानी खेलो इंडिया अनिवासी प्रशिक्षण केंद्राकरिता (दि. ८) ऑगस्ट रोजी खेळाडू निवळ चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. यापुर्वी ही चाचणी ३० जुलै २०२६ रोजी ठेवण्यात आली होती. परंतु अतिवृष्टीमुळे सदर चाचणी रद्द करण्यात आली. ८ ऑगस्ट रोजी खेळाडूंची निवड चाचणी जिल्हा क्रीडा संकुल येथे होणार आहे. १४ वर्षे आतील मुले –मुली यांनी ८ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता उपस्थित राहावे. खेळाडूचा जन्म ३० जुलै २०१३ ते ३० जुलै २०१५ या कालावधीत असावा. उंचीला प्राधान्य देण्यात येईल. सर्व खेळाडूंनी स्वतःच्या तयारीने यावे. प्रशिक्षण केंद्र हे अनिवासी आहे. आधारकार्ड व जन्म दाखला प्रत सोबत आणावे. खेळाडूंनी पासपोर्ट साईज २फोटो सोबत आणावे. निवड चाचणी करिता चंद्रपूर जिल्ह्यातील व महानगरपालिका शाळेतील जास्तीत जास्त खेळाडूंनी आपली नावे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे कार्यालयीन वेळेत नोंदणी करून चाचणीच्या दिवशी उपस्थित रहावे. अधिक माहितीकरिता क्रीडा अधिकारी मोरेश्वर गायकवाड (मो.न. ९४२३६७३२३२) व खेलो इंडिया मैदानी प्रशिक्षक रोशन भूजाडे (मो.न. ७७९८१७४३५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी विनोद ठिकरे यांनी केले आहे.

## अमेरिकन क्रिकेटपटूवर आठ वर्षांची बंदी

**दुबई :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने भारतीय-अमेरिकन क्रिकेटपटू बोडुगुम अखिलेश रेड्डी यांच्यावर महत्त्वपूर्ण कारवाई केली आहे. या क्रिकेट संस्थेनं त्याच्यावर आठ वर्षांची बंदी घातली आहे. आयसीसीच्या भ्रष्टाचारविरोधी न्यायाधिकरणानं रेड्डीला भ्रष्टाचारविरोधी संहितेच्या तीन गंभीर उल्लंघनांसाठी दोषी ठरवले आहे. २०२५ च्या अबू धाबी टी१० लीगशी संबंधित आहे. अमिरात क्रिकेट बोर्डाने




या स्पर्धेसाठी भ्रष्टाचारविरोधी कारवायांवर देखरेख करण्याची जबाबदारी आयसीसीकडे सोपवली होती. आयसीसीच्या मते, बोडुगुम अखिलेश रेड्डीने स्पर्धेदरम्यान सामन्यांच्या निकालावर आणि खेळाच्या प्रवाहावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला. इतकंच नाही, तर त्यानं दुसऱ्या एका खेळाडूला मॅच-फिक्सिंगमध्ये सहभागी होण्यासाठी प्रवृत्त केलं आणि या कटात मदत करण्याचा प्रयत्नही केला. तपासादरम्यान, तपास यंत्रणेला पुरावे मिळू नयेत म्हणून त्यानं आपल्या मोबाईल फोनमधील महत्त्वाचा डेटा आणि चॅट्स डिलीट केले. न्यायाधिकरणाने हा देखील एक गंभीर गुन्हा मानला आहे. आयसीसीनं स्पष्ट केले आहे की, रेड्डीवर लादलेली आठ वर्षांची बंदी २१ नोव्हेंबर २०२५ पासून लागू होईल. याच दिवशी त्याला तात्पुरतं निलंबित करण्यात आले होते. याचा अर्थ असा की, तो आता दीर्घकाळासाठी कोणत्याही स्तरावरील मान्यताप्राप्त क्रिकेटमध्ये सहभागी होऊ शकणार नाही.

# राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेची मशाल भारताच्या हाती

- दुसऱ्यांदा स्पर्धेचे यजमान पद
- अहमदाबामध्ये रंगणार स्पर्धा

**| मुंबई | वृत्तसंस्था |**

स्कॉटलंडमधील ग्लासगोने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेला रविवारी रंगतदार आणि भावपूर्ण निरोप दिला. मात्र, समारोप सोहळ्यातील सर्वाधिक लक्षवेधी क्षण ठरला तो २०३० च्या शताब्दी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेची धुरा अधिकृतपणे भारतातील अहमदाबादकडे सोपविण्याचा. राष्ट्रकुल स्पर्धेचा झेंडा ऑलिम्पिक आणि विश्वविजेता नीरज चोप्रा, भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा पी. टी. उषा आणि गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांच्याकडे सुपूर्द होताच, क्रीडा जगताच्या नजरा आता भारताकडे वळल्या आहेत.



त्याआधी स्कॉटलंडच्या संगीत, संस्कृती आणि परंपरेचा अनोखा आविष्कार समारोप सोहळ्यात पाहायला मिळाला.

स्कॉटिश कवयित्री जॅकी के. यांनी मग्लासगो हे जगातील प्रत्येक नागरिकाचे स्वागत करणारे शहर आहे. या भावस्पर्शी संदेशातून यजमान शहराच्या आदरातिथ्याची ओळख करून दिली. ऑस्ट्रेलियन गायिका डेल्टा गुड्रेम, स्कॉटिश कलाकार पॅमी बार्न्स, प्रायमल स्क्रीम, एलेफंट सेशन्स आणि इतर कलाकारांच्या बहारदार सादरीकरणाने समारोप सोहळ्याला रंगत आणली. दरम्यान, स्कॉटलंडच्या पॅरा खेळाडू मेलानी वूड्स हिला उत्कृष्ट कामगिरीसाठी प्रतिष्ठेचा 'डेव्हिड डिक्सन पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

ग्लासगोने ११ दिवसांच्या स्पर्धेचे यशस्वी आयोजन करत आदरातिथ्य, मैत्री आणि एकतेचा संदेश दिला. आता २०३० मध्ये शताब्दी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनातून भारताला जगासमोर आपली क्षमता सिद्ध करण्यासाठी आतूर झाला आहे. १९३० मध्ये सुरू झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेला २०३० मध्ये शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. भारत दुसऱ्यांदा या स्पर्धेचे यजमान पद भूषवणार असून २०१०नंतर पुन्हा एकदा जगातील सर्वोत्तम खेळाडूंचे स्वागत करण्यासाठी सज्ज झाला आहे.

### दिमाखदार सोहळा

वसुधैव कुटुंबकम् द वर्ल्ड इज वन फॅमिली या संकल्पनेवर आधारित भारतीय सांस्कृतिक सादरीकरणाने ग्लासगोच्या मंचावर भारताची सांस्कृतिक ताकद आणि परंपरेचा दिमाखदार सोहळा जगासमोर उभा केला. अभिनेत्री आणि माजी विश्वसुंदरी मानुषी छिल्लरच्या नेतृत्वाखाली सादर झालेल्या कार्यक्रमात 'वंदे मातरम'च्या १५० वर्षांच्या गौरवशाली प्रवासाला सलाम करण्यात आला. शंकर महादेवन यांच्या संगीताला शियामक डावर यांच्या नृत्यदिग्दर्शनाची जोड लाभली, तर शिवम आणि सिद्धार्थ महादेवन तसेच गायिका भूमी त्रिवेदी यांच्या दमदार सादरीकरणाने भारतीय रंगमंच अक्षरशः उजळून निघाला.

## सात्विक-चिरागला ५वे मानांकन

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

बीडब्ल्यूएफ जागतिक अजिंक्यपद २०२६ स्पर्धेसाठीचे मानांकन निश्चित करण्यात आले. १७ ते २३ ऑगस्ट दरम्यान नवी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडियमवर होणाऱ्या या स्पर्धेसाठी, भारताच्या पीव्ही सिंधूला महिला एकेरीमध्ये नववे मानांकन देण्यात आले आहे. पुरुष दुहेरीमध्ये सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना पाचवे मानांकन मिळाले आहे.



सिंधूने अलीकडेच जपान ओपन जिंकले आहे, तर सात्विक आणि चिराग हे २०२२ च्या आशियाई खेळांमधील सुवर्णपदक विजेते आहेत. चीनचा शी युकी पुरुष एकेरीमध्ये अव्वल मानांकित आहे, तर दक्षिण कोरियाच्या एनसी यंगला महिला एकेरीमध्ये पहिले मानांकन मिळाले आहे.

जपानच्या अकाने यामागुचीला दुसरे, चीनच्या वांग झी यीला तिसरे आणि चेन युफेईला चौथे मानांकन मिळाले आहे. दक्षिण कोरियाच्या किम वॉन हो आणि सेओ सेउंग जे यांना पुरुष दुहेरीमध्ये पहिले मानांकन मिळाले आहे. चीनच्या लिऊ शेंग शू आणि टेंग निंग यांना महिला दुहेरीमध्ये प्रथम मानांकन मिळाले आहे. दक्षिण कोरियाच्या फेंग यान झी आणि हुआंग डोंग पिंग यांना मिश्र दुहेरीमध्ये प्रथम मानांकन मिळाले आहे. बीडब्ल्यूएफ जागतिक अजिंक्यपद स्पर्धा २०२६ मधील पाचपैकी चार गटांमध्ये किमान एका भारतीय खेळाडूला किंवा जोडीला मानांकन मिळाले आहे. भारताच्या पाचही गटांमध्ये प्रत्येकी दोन खेळाडू आहेत. सिंधू व्यतिरिक्त, उन्नती हुडा महिला एकेरीमध्ये सहभागी होईल. लक्ष्य सेन आणि आयुष शेट्टी पुरुष एकेरीमध्ये स्पर्धा करतील. लक्ष्यला १४ वे मानांकन मिळाले आहे.

## ऑस्ट्रेलिया 'अ'महिला संघाची घोषणा



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारत दौऱ्यावर जाणाऱ्या १५ सदस्यीय ऑस्ट्रेलिया अ महिला क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली. भारत दौऱ्यादरम्यान, तीन टी-२० सामने न्यू चंदीगड येथील महाराजा यादवेंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळले जातील. तीन एकदिवसीय सामने मोहाली येथे, तर चार दिवसीय सामना धरमशाला येथे खेळले जातील. ऑस्ट्रेलिया महिला संघ डार्सी ब्राउन, मैटलान ब्राउन, निकोल फाल्टम, टेस फ्लिंटॉफ, सिएना जिंजर, चार्ली नॉट, अनिका लॉईड, केटी मॅक, लिली मिल्स, फ्रँकी निक्लिन, हेली सिल्व्हर-होम्स, रॅशेल ट्रेनमन, कोर्टनी वेब, टाहलिया विल्सन आणि टायला व्हेमिंक यांचा समावेश केला आहे.

## सेंट लुईस रॅपिडमध्ये प्रज्ञानानंदने उत्कृष्ट कामगिरी

**| सेंट लुईस | वृत्तसंस्था |**

भारतीय ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानानंदने उत्कृष्ट कामगिरी करत सेंट लुईस रॅपिड अँड ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेच्या रॅपिड टप्प्यात अव्वल स्थान पटकावले आहे. नऊ फेऱ्यांनंतर, त्याने शक्य असलेल्या १८ पैकी १२ गुण मिळवले आहेत. आणि त्यामुळेच या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या ग्रँड चेस टूर (जीसीटी) फायनल्समध्ये पोहोचण्याची अपेक्षा आहे. २०२६ च्या विश्वविजेतेपदाच्या शर्यतीतून बाहेर पडलेल्या प्रज्ञानानंदने रॅपिड टप्प्यात अचूक रणनीती, उत्कृष्ट तंत्र आणि विजयी वृत्तीचे शानदार प्रदर्शन केले. अंतिम (नवव्या) फेरीत नेदरलँड्सच्या ग्रँडमास्टर जॉर्डन व्हॅन फोरिस्टकडून पराभव पत्करावा लागला



असला तरी, तो अजूनही एका गुणाच्या आघाडीसह पुढे आहे. उझबेकिस्तानचा झवोखिर सिंदारोव्ह ११ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. या वर्षीच्या विश्वबुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सिंदारोव्ह भारताच्या डी. गुकेशला आव्हान देईल. अमेरिकेचा वेस्ली सो देखील ११ गुणांसह अव्वल स्थानाच्या शर्यतीत कायम आहे. मात्र, स्पर्धेचा निकाल केवळ रॅपिड टप्प्यावर अवलंबून राहणार नाही. खेळाडू आता १८ ब्लिट्झ सामने खेळतील. आणि प्रत्येक विजयासाठी एक गुण मिळेल. एकूण २,००,००० अमेरिकन डॉलर्सच्या बक्षीस रकमेच्या या स्पर्धेच्या विजेत्याला ५०,००० अमेरिकन डॉलर्स मिळतील. प्रज्ञानानंदने अंतिम फेरी जिंकली असती, तर ब्लिट्झ टप्प्यात त्याची आघाडी आणखी मजबूत झाली असती. रॅपिड टप्प्यात त्याने चार विजय, चार बरोबरी आणि एका पराभवासह १२ गुण मिळवले आहेत. रॅपिड टप्प्यानंतर, लेव्हॉन अरोनियन, लेनियर डोमिंग्वेझ पेरेझ, अनिश गिरी आणि व्हिन्सेंट केमर हे प्रत्येकी नऊ गुणांसह गुणतालिकेत चौथ्या स्थानावर बरोबरीत आहेत. विशेषतः केमरला ब्लिट्झ बुद्धिबळातील एक बलाढ्य खेळाडू मानले जाते आणि तो विजेतेपदाची शर्यत रोमांचक बनवू शकतो.

## विल्यम्स भगिनींना दुहेरीत वाईल्डकार्ड एन्ट्री

**| वॉशिंग्टन | वृत्तसंस्था |**

सेरेना विल्यम्स आणि व्हीनस विल्यम्स दुहेरीच्या कोर्टवर पुन्हा एकदा एकत्र खेळण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. यूएस ओपनच्या आधी होणाऱ्या प्रतिष्ठित सिनसिनाटी ओपनच्या दुहेरीच्या ड्रॉमध्ये त्यांना वाईल्डकार्ड प्रवेश मिळाला आहे. स्पर्धेच्या आयोजकांनी याची अधिकृत घोषणा केली. २०२२ च्या यूएस ओपननंतर पहिल्यांदाच या भगिनी एका अधिकृत स्पर्धेत दुहेरी जोडी म्हणून खेळणार आहेत. सिनसिनाटी ओपन ही त्यांची एकत्र पहिलीच दुहेरीतील उपस्थिती असेल. त्यांना यावर्षी विम्बल्डनसाठीही वाईल्डकार्ड मिळाले होते, परंतु सेरेना विल्यम्सच्या दुखापतीमुळे त्यांना कोर्टवर उतरता आले नाही.



सेरेना आणि व्हीनस यांना महिला टेनिसच्या इतिहासातील सर्वात यशस्वी दुहेरी जोड्यांपैकी एक मानले जाते. त्यांनी १४ ग्रँडस्लॅम महिला दुहेरी विजेतेपदे जिंकली आहेत. त्यांनी ३ ऑलिम्पिक सुवर्णपदके जिंकली आहेत. त्यांनी अनेक वर्षांपासून दुहेरी स्पर्धेवर वर्चस्व गाजवले आहे. सेरेनाने चार वर्षांनंतर विम्बल्डनमध्ये एकेरी खेळून स्पर्धात्मक टेनिसमध्ये पुनरागमन केले आहे. जरी ती आपला पहिला सामना हरली असली तरी, सिनसिनाटी ओपनमध्ये व्हीनससोबत दुहेरी खेळणे हे तिच्या पुनरागमनाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. या महिन्याच्या अखेरीस सुरू होणाऱ्या यूएस ओपनमधील मिश्र दुहेरीच्या स्पर्धेत व्हीनस विल्यम्स कझाकस्तानच्या अलेक्झांडर बुब्लिकसोबत खेळणार आहे. यूएस ओपनच्या आधी सिनसिनाटी ओपनमध्ये विल्यम्स भगिनींच्या पुनरागमनामुळे टेनिस चाहत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## तैपेई ओपन जिंकणारी तन्वी ठरली तरुण बॅडमिंटनपटू

**| तैपेई | वृत्तसंस्था |**

भारताची युवा बॅडमिंटन स्टार तन्वी शर्माने तैपेई ओपन सुपर-३०० स्पर्धेत महिला एकेरीचे विजेतेपद पटकावून इतिहास रचला आहे. पंजाबच्या या १७ वर्षीय बॅडमिंटनपटूने अंतिम सामन्यात व्हिएतनामच्या सहाव्या मानांकित थुई लिन गुयेनचा २१-१६, २१-१६ असा पराभव करून आपल्या कारकिर्दीतील पहिले बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर विजेतेपद पटकावले. हा सामना केवळ ३६ मिनिटे चालला.



२००८ ची विजेती सायना नेहवालनंतर तैपेई ओपन महिला एकेरीचे विजेतेपद जिंकणारी तन्वी ही पहिली भारतीय बॅडमिंटनपटू ठरली आहे. तिच्या कारकिर्दीतील हे पहिले बीडब्ल्यूएफ सुपर-३०० विजेतेपदही आहे.

गेल्या वर्षी, ती यूएस ओपन सुपर-३०० च्या अंतिम फेरीत पोहोचली होती, पण उपविजेती ठरली होती. या विजयामुळे, तन्वी तैपेई ओपनच्या इतिहासातील कोणत्याही गटातील सर्वात तरुण विजेती ठरली आहे. १७ वर्षे आणि २२२ दिवसांची असताना, तन्वी तैपेई ओपनच्या इतिहासातील सर्वात तरुण विजेती, तसेच स्पर्धेतील सर्वात तरुण अंतिम फेरीतील बॅडमिंटनपटू ठरली.

## फ्रँचायझीकडून ट्रेंट बोल्टला रिलीज

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

दक्षिण आफ्रिकेतील टी-२० लीग मधील सहा संघांनी त्यांच्या रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर केली आहे. या सहा फ्रँचायझीमध्ये मिचेल मार्श, जो रूट, सॅम कुरन, जेसन होल्डर आणि फिल सॉल्ट हे तगडे खेळाडू या पर्वात खेळताना दिसतील. डर्बन सुपर जायंट्स आणि पार्ल रॉयल्स या दोनच फ्रँचायझींनी त्यांच्या प्रत्येकी १९ खेळाडूंचा कोरम पूर्ण केला आहे. उर्वरित चार संघांमध्ये एकूण १९ जागा अद्याप रिक्त आहेत. पहिल्या दोन पर्वात खेळणारा सॅम कुरन यंदाच्या पर्वात डर्बन सुपर जायंट्सकडून खेळणार आहे. त्याच्यासोबतीला इंग्लंडचा सहकारी जॉस बटलर, जो रूट, लहुआन ड्रे प्रेटोरियन हे असतील. गत उपविजेत्या प्रेटोरिया कॅपिटल्सने फिल सॉल्ट व मॅट शॉर्ट यांना करारबद्ध केले आहे.

**विविध स्पर्धेत जिंकली ३९ पदके** | **क्रीडा मंत्र्यांनी खेळाडूंची घेतली भेट**

# भारतीय खेळाडूंचे भव्य स्वागत

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

नुकतीच स्कॉटलंड येथे कॉमनवेल्थ गेम्सची स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी शानदार खेळी केली. भारत देशाने या स्पर्धेत तब्बल ३९ पदके जिंकली आहेत. अनेक क्रीडा प्रकारांत भारताने मोठे यश प्राप्त केले आहे. दरम्यान या सर्व खेळाडूंचे दिल्ली एअरपोर्टवर भव्य स्वागत करण्यात आले. तसेच केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी खेळाडूंची भेट घेऊन त्यांचा सन्मान केला. याबाबत अधिक माहिती जाणून घेऊयात.




कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मधील बॉक्सिंग, ज्युडो आणि पॅरा-थलेटिक्स प्रकारात ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या भारतीय खेळाडूंचा नवी दिल्ली येथे केंद्रीय क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी खेळाडूंच्या ऐतिहासिक कामगिरीचा गौरव करत त्यांना रोख पारितोषिकांचे धनादेश प्रदान करण्यात आले. कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये गोल्ड मेडल जिंकणाऱ्या खेळाडूंना ३० लाख, रौप्यपदक जिंकणाऱ्या खेळाडूंना २० लाख आणि कांस्यपदक जिंकणाऱ्या खेळाडूंना १० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

केवळ सरकारी नोकरी मिळवण्याच्या उद्देशाने राष्ट्रकुल पदक जिंकू नका. निवृत्तीनंतर सर्वांनी आपापल्या स्पोर्ट्स अकादमी सुरू करा आणि नव्या पिढीला मार्गदर्शन करा.

'इंडिया फर्स्ट' हेच आपले मुख्य ध्येय असायला हवे.केंद्र सरकारने भारतीय खेळांच्या शाश्वत विकासासाठी 'खेलो इंडिया' योजनेचा विस्तार केला आहे. तसेच त्यासाठी ३६,००० कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.कॉमनवेल्थ गेम्स २०२६ स्पर्धा झाल्यावर लवकरच आशियाई खेळ २०२६ सुरू होणार आहे.

> "राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ मधील ऐतिहासिक यशानंतर आता भारतीय खेळाडूंचे पुढील मुख्य लक्ष्य आशियाई खेळ २०२६ हे असणार आहे. खेळाडूंचा आत्मविश्वास वाढवत आगामी आशियाई स्पर्धेत आणखी सुवर्णपदके जिंकण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले आहे.
> -डॉ. मनसुख मांडविया
> केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण मंत्री"

## भारतीय संघ श्रीलंकेत दाखल

**| कोलंबो | वृत्तसंस्था |**

शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघ, १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी श्रीलंकेत दाखल झाला आहे. भारतीय संघ आघाडीचा फलंदाज साई सुदर्शनशिवाय दाखल झाला आहे. हा फलंदाज अद्याप तंदुरुस्त नाही. तो बंगळूरु येथील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये आहे, जिथे वैद्यकीय कर्मचारी त्याच्यावर देखरेख ठेवत आहेत. भारत संघाच्या श्रीलंका दौऱ्यादरम्यान सुदर्शनला दुखापत झाली होती. सुदर्शनच्या पायाच्या बोटाला दुखापत झाली आहे. तो सध्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये उपचार घेत असून एक तास फलंदाजीचा सराव करत आहे. पुढील तीन ते चार दिवस



तो असेच करत राहील आणि या काळात त्याच्यावर देखरेख ठेवली जाईल. तो श्रीलंकेला कधी प्रवास करेल याचा निर्णय घेतला जाईल. पहिल्या कसोटीत त्याचा सहभाग अद्याप निश्चित नाही असे मानले जात आहे. सेंटर ऑफ एक्सलन्समधील वैद्यकीय कर्मचारी त्याच्या तंदुरुस्तीबाबत घाई करत नाहीत. वेगवान गोलंदाज हर्षित राणाच्या दुखापतीच्या पुनरावृत्तीमुळे प्रश्न निर्माण झाले आहेत. या वेगवान गोलंदाजाने आयर्लंड दौऱ्यादरम्यान भारतीय संघात पुनरागमन केले होते. मात्र, इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेदरम्यान तो पुन्हा जखमी झाला. त्याला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली. तो सध्या श्रीलंका दौऱ्यातून बाहेर आहे. तो कधी परत येईल हे अद्याप कळलेले नाही. श्रीलंका दौऱ्यावरील कसोटी मालिकेपूर्वी भारतीय संघ ७ ऑगस्ट रोजी तीन दिवसीय सराव सामना खेळणार आहे. हा सामना मूळतः चार दिवसांचा नियोजित होता. तो कोलंबो येथे खेळवला जाणार आहे. यानंतर, भारतीय संघ पहिल्या कसोटीसाठी गॉलला जाईल. दुसरी कसोटी २३ ऑगस्टपासून कोलंबो येथे खेळवली जाणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)